मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १०९ ■ शनिवार, २७ डिसेंबर २०२५ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# भीमा-कोरेगाव शौर्य दिनासाठी प्रशासन सज्ज

## १ जानेवारी रोजी २०९ वा विजयस्तंभ अभिवादन सोहळा; सुमारे २० लाख अनुयायांची अपेक्षा

**दैनिक युवक आधार**

**पुणे :** मौजे पेरणे येथे येत्या १ जानेवारी २०२६ रोजी होणारा २०९ वा भीमा कोरेगाव विजयस्तंभ शौर्य दिन अभिवादन सोहळा मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा होणार आहे. या सोहळ्यासाठी देशभरातून सुमारे २० लाख भीम अनुयायी उपस्थित राहण्याची शक्यता असून, त्यांच्या सोयीसुविधांसाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक तयारी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर जास्तीत जास्त आंबेडकरी अनुयायांनी या ऐतिहासिक सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन भीमा-कोरेगाव विजयस्तंभ दिन समन्वय समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे यांनी केले आहे.



अभिवादन सोहळ्यासाठी येणाऱ्या अनुयायांना पिण्याचे पाणी, वाहनतळ, स्वच्छतागृहे आदी सर्व पायाभूत सुविधा यंदा मागील वर्षीपेक्षा अधिक प्रमाणात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यासंदर्भात पुणे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीसोबत समन्वय समिती व समाजबांधवांच्या सहा पेक्षा अधिक बैठका पार पडल्या असून, नागरिकांकडून प्राप्त सूचनांच्या आधारे अंतिम नियोजन करण्यात आले आहे. यंदाचे नियोजन अधिक दर्जेदार व सुविधा-संपन्न राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

सुरक्षेच्या दृष्टीने विशेष खबरदारी घेण्यात येत असून, समाजकंटक व चोरट्यांवर लक्ष ठेवण्यासाठी पुणे पोलीस आयुक्तालयामार्फत पहिल्यांदाच ड्रोनद्वारे फेस-स्कॅनिंग तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. याशिवाय, यापूर्वी घडलेल्या अप्रिय घटनांचा अनुभव लक्षात घेता, पुणे शहर व पुणे ग्रामीण पोलीस दलामार्फत तब्बल १३ हजारांहून अधिक पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. नागरिकांची सुरक्षितता आणि गोंधळ टाळणे याला प्राधान्य देत सुरक्षा व्यवस्थेत सर्वतोपरी उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

**वाहतुकीवर बदल**

भीमा-कोरेगाव येथील विजयस्तंभ परिसरात विजयस्तंभ कार्यक्रम पार पडणार असल्यामुळे शहर व ग्रामीण भागातील वाहतूक व्यवस्थेसाठी पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांनी ३१ डिसेंबर ते १ जानेवारी २०२६ या कालावधीत महत्त्वाचे बदल लागू केले आहेत. चाकण-शिक्रापूर-शिरूर मार्गे जाणाऱ्या सर्व जड व अवजड वाहनांना प्रवेश बंदी घालण्यात आली आहे. ही वाहने पर्यायी मार्गांद्वारे वळविली जातील. वाघोली चौक, पेरणे फाटा, भारतमाता चौक व मोशी चौक मार्गे भीमा कोरेगावकडे जाणाऱ्या जड वाहनांना प्रवेश दिला जाणार नाही. चाकण-शिक्रापूर-शिरूर मार्ग फक्त अत्यावश्यक सेवा वाहतुकीसाठी खुला राहील; इतर वाहनचालकांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागणार आहे. वाहतूक पोलिसांनी नागरिक, भाविक व वाहनचालकांना निर्धारित पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे, नियमांचे पालन करण्याचे आणि अनावश्यक वाहनें घेऊन भीमा-कोरेगाव परिसरात येऊ नये, असे आवाहन केले आहे. वाहतूक बदलाबाबत माहिती फलक, अतिरिक्त पोलीस बंदोबस्त आणि मार्गदर्शन पथके तैनात करण्यात आले आहेत.

**डॉ. आंबेडकरांच्या मानवंदनेचे शताब्दी वर्ष**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भीमा-कोरेगाव विजयस्तंभाला दिलेल्या भेटीला येत्या वर्षी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे यंदाचे वर्ष हे बाबासाहेबांच्या मानवंदनेचे शताब्दी वर्ष म्हणून साजरे करण्यात येणार आहे. या शताब्दी वर्षाची औपचारिक सुरुवात १ जानेवारी २०२६ रोजी होणार असून, यानिमित्ताने बाबासाहेबांसोबत विजयस्तंभावर अभिवादनासाठी आलेल्या अनुयायांच्या कुटुंबीयांचे संयुक्त अभिवादन करण्याचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

**निवृत्त सैनिकांकडून महार रेजिमेंटला मानवंदना**

शौर्यस्तंभावरून प्रेरणा घेऊन महार रेजिमेंटची स्थापना करण्याची मागणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२७ साली केली होती. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी महार रेजिमेंटचे निवृत्त सैनिक लष्करी इतमामाने विजयस्तंभावर मानवंदना देतात. यंदा यशसिद्धी आजी-माजी सैनिक फाऊंडेशनच्या वतीने सुमारे ३,००० निवृत्त सैनिकांकडून राष्ट्रगीताद्वारे महार रेजिमेंटला मानवंदना देण्यात येणार आहे.

# चिर्ले ही क्रिकेटची पंढरी आहे : महेंद्रशेठ घरत

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** "चिर्ले ही क्रिकेटची पंढरी आहे. रायगड जिल्ह्यात सर्वप्रथम नाईट क्रिकेट स्पर्धा या चिर्लेच्या मैदानावर झाल्या होत्या. तो इतिहास चिर्लेच्या तरुणांनी आणि ग्रामस्थांनी आजपर्यंत जपला आहे. या मैदानावरील व्यासपीठावर राजकारणातील अनेक दिग्गज मंडळी येऊन गेली आहेत. त्यामुळे या भूमीला क्रिकेटचा उत्तम वारसा आहे. चिर्ले हे हुतात्म्यांचे गाव आहे.

त्यामुळे या गावाला कायमस्वरूपी मैदानासाठी मी सर्वतोपरी सहकार्य करेन," असे मत आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी व्यक्त केले.



उरण तालुक्यातील चिर्ले येथे चॅलेंजर ट्रॉफीचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते झाले. प्रकाशझोतातील या ट्रॉफीचे बुधवारी (ता. २४) महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

यावेळी चॅलेंजर ट्रॉफीचे प्रमुख आयोजक माजी उपसरपंच समाधान माळी यांची उरण तालुका काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी निवड करून त्यांना नियुक्तीचे पत्र देण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, अल्पसंख्याक रायगड जिल्हा अध्यक्ष अखलाक शिलोत्री, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सदस्य डॉ. मनीष पाटील, उरण तालुका काँग्रेस अध्यक्ष विनोद म्हात्रे, अलंकार परदेशी, वैभव पाटील, मुरलीधर ठाकूर, विनोद पाटील, घनश्याम पाटील, अविनाश ठाकूर, रमेश पाटील, अश्वित थळी, तसेच असंख्य काँग्रेस कार्यकर्ते आणि एमजी ग्रुपचे सदस्य उपस्थित होते. यावेळी भव्य कार रॅलीने रसिकांचे लक्ष्य वेधले होते.

# पेट्रोल पंपांमध्ये भारत जगात तिसरा!

## संख्या १ लाखांवर, १० वर्षांत दुप्पट वाढ; टॉप २ देश कोणते?

**दैनिक युवक आधार**

**नवी दिल्ली :** देशातील पेट्रोल पंपांची संख्या १,००,००० वर गेली असून २०१५ पासून ही संख्या दुप्पट झाली आहे. वाहनांच्या मालकीमध्ये सातत्याने होत असलेल्या वाढीच्या पार्श्वभूमीवर सरकारी मालकीच्या इंधन विक्रेत्या कंपन्यांनी बाजारातील आपला हिस्सा टिकवून ठेवण्यासाठी आणि ग्रामीण व महामार्गांपर्यंत इंधनाची उपलब्धता वाढवण्यासाठी आक्रमकपणे आऊटलेट्सचा विस्तार केला आहे.

**अमेरिका, चीननंतर भारत तिसऱ्या क्रमांकावर**

पेट्रोलियम मंत्रालयाच्या पेट्रोलियम नियोजन आणि विश्लेषण कक्षाकडून (पीपीएसी) उपलब्ध झालेल्या आकडेवारीनुसार नोव्हेंबरच्या अखेरीस देशात १,००,२६६ पेट्रोल पंप आहेत, जे अमेरिका आणि चीननंतर तिसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे जाळे आहे, ज्यांचा भौगोलिक विस्तार भारतापेक्षा खूप मोठा आहे. अमेरिकेतील



आउटलेट्सच्या संख्येबद्दल कोणताही अधिकृत डेटा नसला तरी, २०२४ च्या एका अहवालानुसार देशातील किरकोळ पेट्रोल पंपांची संख्या १,९६,६४३ होती. तेव्हापासून काही आउटलेट्स बंद झाली असावीत. चीनबद्दल, गेल्या वर्षीच्या एका अहवालात पेट्रोल पंपांची संख्या १,१५,२२८ असल्याचे म्हटले होते, तर चायना पेट्रोकेमिकल कॉर्पोरेशन (सिनोपेक) आपल्या वेबसाइटवर म्हणते की, ३०,००० पेक्षा जास्त कार्यरत पेट्रोल पंपांसह ती चीनमधील सर्वात मोठी इंधन किरकोळ विक्रेता आहे. सिनोपेक आकारमानाने मोठी असली तरी, तिच्या आउटलेट्सची संख्या भारतीय बाजारपेठेतील अग्रणी असलेल्या इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या (आयओसी) ४१,६६४ आउटलेट्ससमोर खूपच कमी वाटते.

**९० टक्क्यांहून अधिक सरकारी कंपन्यांचे**

भारतात इंडियन ऑइल कॉर्पोरेशन (आयओसी), भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) सारख्या सरकारी कंपन्यांच्या मालकीचे ९० टक्क्यांहून अधिक पंप आहेत. यात इंडियन ऑइल कॉर्पोरेशन (आयओसी) ४१,६६४ पंपांसह पहिल्या क्रमांकावर आहे. तर, बीपीसीएलचे २४,६०५ पंपांसह दुसरे सर्वात मोठे नेटवर्क आहे, त्यानंतर एचपीसीएलचा क्रमांक लागतो, ज्याचे २४,४१८ आउटलेट्स आहेत.

रशियाच्या रोसनेफ्ट-समर्थित नायरा एनर्जी लिमिटेड ही ६,९२१ आऊटलेट्ससह सर्वात मोठी खासगी इंधन विक्रेता कंपनी आहे, त्यानंतर रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि बीपीच्या संयुक्त उपक्रमाच्या २,११४ पंपांचा क्रमांक लागतो. शेलचे ३४६ आऊटलेट्स आहेत. इंधन किरकोळ विक्री व्यवसायात खासगी क्षेत्राचा सहभाग आर्थिक वर्ष २००४ मध्ये २७ पंपांसह सुरू झाला होता.

**दशकभरात दुप्पट वाढ**

पीपीएसीच्या आकडेवारीनुसार, पेट्रोल पंपांचे जाळे २०१५ मधील ५०,४५१ पंपांवरून जवळपास दुप्पट झाले आहे. त्या वर्षी, खासगी कंपन्यांच्या मालकीच्या २,९६७ आऊटलेट्सचा वाटा जवळपास ५.९ टक्के होता. सध्या, त्यांचा एकूण बाजारात ९.३ टक्के वाटा आहे.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला ‘दिबां’च्या नावासाठी कृती समिती ठाम - लोकनेते रामशेठ ठाकूर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अधिकृतपणे सुरू झाल्यानंतर या विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे ही सर्वपक्षीय कृती समितीची ठाम भूमिका असल्याचे समितीचे उपाध्यक्ष, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्पष्ट केले आहे.

येथील विमानतळावरून पहिले प्रवासी विमान उड्डाण झाल्याच्या पार्श्वभूमीवर प्रतिक्रिया देताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, लोकनेते दि.बा. पाटील यांनी या परिसरातील स्थानिक भूमिपुत्रांची अस्मिता जागृत ठेवण्यासाठी आणि त्यांचे हक्क अबाधित राहावेत यासाठी शेवटपर्यंत संघर्ष केला. त्यांच्या या योगदानाची ओळख म्हणून या विमानतळाला ‘दिबा’साहेबांचेच नाव दिले पाहिजे ही आमची ठाम आणि रास्त मागणी आहे.

या मागणीसाठी सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने तसेच स्थानिक भूमिपुत्रांच्या पुढाकारातून यापूर्वी विविध आंदोलने करण्यात आली. या



आंदोलनांमुळे आमच्यावर अनेक केसेस झाल्या. गेल्याच महिन्यात या केससाठी मी आणि दशरथदादा पाटील यांच्यासह भूमिपुत्र उरणच्या कोर्टात हजर होतो. या संदर्भात आम्हाला जामीन घेण्याची ही वेळ आली तरीही आम्ही मागे हटलेलो नाही. ‘दिबा’साहेबांच्या नावासाठी आमचा पाठपुरावा अखंड सुरू आहे.

कृती समितीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट आश्वासन दिले आहे की, या विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचेच नाव दिले जाईल. कालही त्यांनी पुन्हा एकदा आपली भूमिका ठामपणे मांडत लवकरच नामकरणाचा निर्णय होईल आणि विमानतळाला ‘दिबा’साहेबांचे नाव दिले जाईल, असे सांगितले आहे. त्यामुळे आम्हाला पूर्ण विश्वास आहे की, ‘दिबा’साहेबांचे नाव या विमानतळाला लवकरच मिळेल, असा विश्वास लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केला.

आपल्या खासदारकीच्या काळातील आठवणी सांगताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, मी खासदार असताना सिडकोचे अधिकारी या प्रकल्पासंदर्भात मला भेटत होते. १९९८-९९पासून गेली तब्बल २५ वर्षे या विमानतळासाठी प्रयत्न सुरू होते, मात्र दीर्घकाळ प्रकल्पाला अपेक्षित गती मिळत नव्हती. नंतरच्या काळात फडणवीस सरकारच्या कार्यकाळात या विमानतळाला खऱ्याअर्थाने गती मिळाली आणि आज ते प्रत्यक्षात सुरू झाले आहे.

विमानतळ सुरू झाल्यामुळे या संपूर्ण विभागात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होणार असून उद्योग, व्यापार आणि आर्थिक विकासाला नवे बळ मिळेल. हे विमानतळ केवळ वाहतुकीचे केंद्रबिंदू नसून नवी मुंबई व रायगड जिल्ह्याच्या विकासाचा नवा अध्याय ठरणार आहे.

# उरणच्या नगराध्यक्षपदी भावना घाणेकर विराजमान : जल्लोषात स्वीकारला पदभार

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी** : उरण नगर परिषदेच्या थेट नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत दणदणीत विजय मिळवल्यानंतर महाविकास आघाडीच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा भावनाताई घाणेकर यांनी आज आपला पदभार स्वीकारला. या पदग्रहण सोहळ्यानिमित्त उरण शहरात महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष साजरा केला. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत भाजपचे नगर परिषदेत १२नगरसेवकांचे संख्याबळ असूनही नगराध्यक्षा पदाच्या निवडणुकीत भावना घाणेकर यांनी भाजपला मोठा धक्का दिला. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आणि काँग्रेसची एकजूट म्हणून परिवर्तनाची लाट पाहायला मिळाली. पदभर स्वीकारल्यानंतर भावना घाणेकर यांनी जनतेचे




आभार मानले. हा विजय जनतेचा आणि कार्यकर्त्यांच्या मेहनतीचा आहे." शहराच्या प्रलंबित समस्या सोडवून सर्वांगीण विकासाला गती देणे हेच माझे मुख्य ध्येय असेल असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले."उरणनगर परिषदेच्या थेट नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत हा ऐतिहासिक विजय मिळवल्यानंतर महाविकास आघाडीच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ.भावना घाणेकर यांनी आज भक्तिमय वातावरणात आपला पदभार स्वीकारला. यानिमित्ताने आयोजित करण्यात आलेली श्री सत्यनारायणाची पूजा , महाप्रसादाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता.सकाळी नगरपरिषद कार्यालयात शास्त्रोक्त पद्धतीने श्री सत्यनारायण महापूजा संपन्न झाली उरण शहराच्या सुख-समृद्धीसाठी आणि विकास कामांना गती मिळण्यासाठी हे पूजन करण्यात आले .आणि पूजेनंतर उपस्थित नागरिक आणि कार्यकर्त्यांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. याचा लाभ हजारो नागरिकांनी घेतला. या सोहळ्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे शहरातील विविध दिव्यांग संस्थांच्या प्रतिनिधींनी दिलेली उपस्थिती. भावना घाणेकर यांनी पदभार स्वीकारताना दिव्यांग बांधवांचे आशीर्वाद घेतले.समाजातील शेवटच्या घटकाचा विकास करणे हे माझे कर्तव्य असून,दिव्यांगांच्या समस्यांना प्राधान्य दिले जाईल .असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. यावेळी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी राजकीय ,सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी गर्दी केली होती .यात प्रामुख्याने महाविकास आघाडीचे वरिष्ठ नेते पदाधिकारी, उरणमधील विविध सामाजिक संस्थांचे अध्यक्ष ,नवनिर्वाचित नगरसेवक आणि हितचिंतक उपस्थित होते.

# मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करा - जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

## पाणंदमुक्त शिवारासाठी जिल्हास्तरीय नियोजन; जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशिम जिल्हा प्रतिनिधी :** मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना ही शासनाची फ्लॅगशिप योजना असून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत सर्वहंगामी व भक्कम रस्ते उपलब्ध करून देणे हा तिचा मुख्य उद्देश आहे. शेतमाल वाहतुकीसाठी दर्जेदार रस्ते उपलब्ध झाल्यास उत्पादन खर्चात बचत होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे. त्यामुळे योजनेतील सर्व कामे शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, गुणवत्तापूर्ण व कालमर्यादेत पूर्ण करावीत, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या.

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना प्रभावीपणे व वेळेत राबविण्यासाठी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते.

या बैठकीत पाणंद रस्त्यांची निवड प्रक्रिया, यांत्रिकी पद्धतीने होणाऱ्या कामांची अंमलबजावणी, अतिक्रमणमुक्ती, तांत्रिक निकषांचे पालन तसेच विविध विभागांमधील समन्वय याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमण हा प्रमुख अडथळा असल्याचे नमूद करण्यात आले. या संदर्भात शासनाने ठरवून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार नोटीस देऊन, आवश्यक तेथे पोलीस बंदोबस्तात अतिक्रमण काढण्याची कारवाई करावी. शेतकऱ्यांकडून मोजणी अथवा पोलीस संरक्षणासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही, याची स्पष्ट माहिती यावेळी देण्यात आली. तसेच, रस्त्याच्या रुंदी, मुरूम व मातीचा थर, पावसाच्या पाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था आदी तांत्रिक बाबींचे काटेकोर पालन करण्याचे निर्देशही देण्यात आले.

योजनेअंतर्गत निधीची उपलब्धता, विविध योजनांमधील निधीचे एकत्रीकरण (Convergence) तसेच क्लस्टर पद्धतीने कामे देऊन रस्ते जलद गतीने पूर्ण करण्याबाबतही बैठकीत आढावा घेण्यात आला. शेतकऱ्यांनी स्वेच्छेने सहकार्य करून पाणंद रस्ते मोकळे केल्यास ही योजना अधिक यशस्वी ठरेल, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी नमूद केले.



पाणंद रस्ते ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची पायाभूत सुविधा असून या रस्त्यांमुळे शेतीमालाची वाहतूक सुलभ होते, उत्पादन खर्चात बचत होते आणि आपत्कालीन परिस्थितीतही शेतापर्यंत पोहोचणे शक्य होते. त्यामुळे योजनेअंतर्गत सुरू असलेली सर्व कामे शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, गुणवत्तेची कोणतीही तडजोड न करता आणि ठरवून दिलेल्या कालावधीत पूर्ण करण्यात यावीत, असे निर्देशही जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.

या आढावा बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी लता फड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी आत्माराम बोंद्रे, सहाय्यक नियोजन अधिकारी संजय राठोड तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम जोशी, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे कार्यकारी अभियंता राजेश राजेंद्र सोनवाल यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये पाणंद रस्त्यांची कामे, प्रत्यक्ष कामांची सद्यस्थिती, खर्चाची प्रगती, कामांची गुणवत्ता, तसेच उर्वरित नियोजित कामांचा कालबद्ध आराखडा यावर बैठकीत सखोल चर्चा करण्यात आली.

जिल्हाधिकारी पुढे बोलतांना म्हणाले, कामांची निवड करताना प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या मागणीला प्राधान्य द्यावे, स्थानिक ग्रामपंचायती, शेतकरी गट व संबंधित यंत्रणांशी समन्वय ठेवून कामे करावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले. काम सुरू असलेल्या ठिकाणी नियमित पाहणी करून अहवाल सादर करावेत, अपूर्ण अथवा निकृष्ट कामांबाबत तात्काळ दुरुस्तीची कारवाई करावी आणि आवश्यकतेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तांत्रिक मार्गदर्शन घ्यावे, अशा सूचनाही देण्यात आल्या.

अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील यांनी आपल्या प्रतिपादनात सांगितले की, मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना ही शासनाची एक महत्त्वाची व फ्लॅगशिप योजना असून या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या दैनंदिन अडचणी दूर करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. त्यामुळे योजनेअंतर्गत हाती घेण्यात आलेली सर्व कामे अत्यंत जबाबदारीने, नियोजनबद्ध पद्धतीने व गुणवत्तेची कोणतीही तडजोड न करता पूर्ण करण्यात यावीत, असे त्यांनी स्पष्ट केले. सर्व संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वय ठेवून कामे वेळेत पूर्ण करावीत, जेणेकरून या योजनेचा थेट आणि दीर्घकालीन लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल, असेही त्यांनी नमूद केले.

बैठकीत रोहयो उपजिल्हाधिकारी कैलास देवरे यांनी माहितीचे सादरीकरण केले. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

---

# सुरगाणा महाविद्यालयात वीर बाल दिवस साजरा

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा** : महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र शासनाच्या सहसंचालक तंत्रशिक्षण विभागांतर्गत २६ डिसेंबर हा दिवस मराठी विभागाच्या वतीने वीर बाल दिवस साजरा करण्यात आला.. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून प्रा.दिपक जोंधळे यांनी वीर बाल दिवसामागील पार्श्वभूमी सांगितली.कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.विजय अहिरे यांनी दिली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, साहित्य, क्रिडा



व अन्य कोणत्याही क्षेत्रात उल्लेखनीय नावलौकिक प्राप्त करणाऱ्या बालकांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी त्याचा गुण गौरव करणे महत्त्वाचे असते त्यासाठी हा दिवस साजरा केला जातो असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. केशव गावित यांनी केले. तर आभार रोशन पवार यांनी मानले. यावेळी कार्यक्रमाला प्रा.बी.डी. धुम, प्रा.भगवान महाले डॉ.अनिल गायकवाड,प्रा.कृष्णा गांगोडे, प्रा. सुभाष कामडी,प्रा.भागीनाथ टोपले,नाना कोर, ओमकार धुम महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विकास परसराम मेश्राम यांना 'अटल बिहारी वाजपेयी सेवा रत्न सन्मान' प्रदान

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड प्रतिनिधी जिल्हा (गोंदिया ) :** समाजसेवा, ग्रामीण विकास आणि पत्रकारिता क्षेत्रात गेली अनेक वर्षे सातत्याने कार्य करणारे सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार विकास परसराम मेश्राम यांना प्रतिष्ठेचा 'अटल बिहारी वाजपेयी सेवा रत्न सन्मान' प्रदान करण्यात आला. जीवन जागृती सेवा संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात हा सन्मान प्रदान करण्यात आला.

विकास मेश्राम हे पत्रकारिता क्षेत्रातही सक्रिय असून त्यांनी दैनिक देशोन्नती, तरुण भारत यांसारख्या नामांकित वृत्तपत्रांसह Max Maharashtra, जागल्या भारत, करंट काऊंटर, CSR, काऊंटर व्ह्यू या ऑनलाईन माध्यमांमध्ये



शेकडो लेख सातत्याने प्रकाशित केले आहेत. त्यांच्या लेखनाचा केंद्रबिंदू हा नेहमीच दलित, आदिवासी, शेतकरी, महिला, पर्यावरण, हवामान बदल व सामाजिक विषमता या ज्वलंत विषयांभोवती राहिला आहे. गेल्या १४ वर्षांहून अधिक काळ त्यांनी ग्रामीण व आदिवासी भागात प्रत्यक्ष क्षेत्रीय पातळीवर काम करत समाजातील दुर्लक्षित घटकांचे प्रश्न केवळ लेखनापुरते न ठेवता प्रत्यक्ष कृतीतून मांडले आहेत. विविध स्वयंसेवी संस्था, संशोधन संस्था व विकास क्षेत्रातील संघटनांसोबत कार्य करत त्यांनी शाश्वत विकासासाठी योगदान दिले आहे.त्यांच्या लेखनातून वास्तववादी मांडणी, समाजाभिमुख दृष्टिकोन आणि संवेदनशील पत्रकारिता दिसून येते.

पुरस्कार स्वीकारताना त्यांनी हा सन्मान वैयक्तिक नसून समाजासाठी झटणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या प्रयत्नांची पावती असल्याची भावना व्यक्त केली. "पुरस्कार तात्पुरते असतात, मात्र कामाची दखल घेतली जाणे हीच खरी प्रेरणा आहे," असे त्यांनी सांगितले.या सन्मानामुळे विकास मेश्राम यांच्या पत्रकारिता व समाजसेवेच्या कार्याला नवी दिशा आणि ऊर्जा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# राजोल पाटील यांच्या उमेदवारीने विरोधकांना भरली धडकी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (प्रतिनिधी) :** राजकीय वारसा घरातूनच लाभलेल्या युवासेना कार्यकारणी सदस्य राजोल संजय पाटील या निवडणूक रिंगणार उतरणार की नाही याची आतापासूनच मीडिया तसेच मतदारांमध्ये उत्सुकता वाढली असून त्या कोणत्या प्रभागातून निवडणूक लढवतील याच्या तर्क वितरकांना उधान आले आहे. लवकरच या सर्व तर प्रश्नांना पूर्णविराम मिळणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

उद्धव ठाकरे गटाचे शिवसेना खासदार संजय दिना पाटील यांची कन्या युवा सेना कार्यकारणी सदस्य राजोल संजय पाटील या निवडणुकीच्या रिंगणात उतरणार की नाही या चर्चांना गेल्या काही दिवसांपासून उधाण आले आहे. भांडुप पश्चिम येथील मतदार संघातील एका प्रभागातून त्या निवडणूक लढविण्यात येणार असल्याची जोरदार चर्चा या ठिकाणी चालू असून त्यांना कुठला प्रभाग मिळतो याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. मात्र त्यांच्या निवडणूक रिंगणात उतरण्याच्या निर्णयामुळे आतापासूनच भांडुप पश्चिम मध्ये त्यांच्या विरोधात उभ्या राहणाऱ्या उमेदवारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. राजोल पाटील यांना घरातूनच राजकीय वारसा मिळाला असून गेले अनेक वर्ष ते सामाजिक कार्यात भाग घेत आहे. तळागाळातील लोकांच्या भेटी घेऊन त्यांच्या समस्यांचे निराकरण करणे, गटार, नाले, शौचालय यांचे प्रश्न तातडीने सोडवण्यात त्यांनी मोलाचे काम केले आहे. राजोल पाटील हा मतदारांसाठी नवा चेहरा नसून त्यांच्या मदतीला धावणारे एक व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या 'जीवनदान' या संस्थेमार्फत त्यांनी हजारो लोकांना नेत्रदान केले असून त्यांच्या कार्याची दखल पक्षश्रेष्ठींनी घेतल्याने त्यांच्या उमेदवारीचा विचार केला जात आहे.

---

# म्हसळयातील युवकांच्या आशेचे केंद्र श्रीराम व्यायाम शाळा अद्याप बंद

**दैनिक युवक आधार**

**म्हसळा तालुका प्रतिनिधी/शिरीष समेळ :** म्हसळा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेली आणि गेल्या अनेक वर्षांपासून शहरातील युवकांच्या आयुष्याला दिशा देणारी, शिस्त, आरोग्य आणि क्रीडा संस्कारांची शिकवण देणारी श्रीराम व्यायाम शाळा कोकणात झालेल्या अतिवृष्टी व भीषण वादळात अक्षरशः उद्ध्वस्त झाली आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे व्यायाम शाळेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून युवकांच्या क्रीडा व आरोग्य क्षेत्रातील प्रगतीसमोर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. वादळाच्या तीव्र तडाख्यात व्यायाम शाळेचे छप्परावरील पत्रे उडून गेले असून व्यायाम शाळेजवळ असलेले मोठे आंब्याचे झाड कोसळून व्यायाम शाळेच्या एका भिंतींचा बळी घेतला असुन इमारतीच्या इतर भिंतींना गंभीर तडे गेले आहेत. यामध्ये आत ठेवलेली महागडी व्यायामाची साधने, वजन उचलण्याची उपकरणे तसेच इतर आवश्यक साहित्य पूर्णपणे नादुरुस्त झाले आहे. एका क्षणात अनेक युवकांच्या मेहनतीवर आणि स्वप्नांवर पाणी फिरले आहे.




शहरातील श्रीराम व्यायाम शाळा ही केवळ एक इमारत नसून ती म्हसळा शहरातील अनेक युवकांच्या आत्मविश्वासाची, शिस्तीची आणि आरोग्याची शाळा राहिली आहे. दररोज पहाटे युवक येथे येऊन नियमित व्यायाम, कसरत, तसेच विविध क्रीडा उपक्रमांचा सराव करत होते. अनेक युवकांनी या व्यायाम शाळेतून जिल्हा, राज्यस्तरावर नाव कमावले असून काही युवक सैन्य, पोलीस व क्रीडा क्षेत्रातही यशस्वी वाटचाल करत आहेत. मात्र वादळानंतर ही व्यायाम शाळा बंद ठेवावी लागल्याने युवकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. वादळाला अनेक दिवस उलटूनही अद्याप व्यायाम शाळेच्या दुरुस्तीसाठी कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. सध्या इमारत पूर्णतः धोकादायक अवस्थेत असून कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे सुरक्षिततेच्या कारणास्तव युवकांना व्यायामापासून दूर राहावे लागत आहे. याचा थेट परिणाम युवकांच्या शारीरिक तंदुरुस्तीवर, मानसिक आरोग्यावर तसेच क्रीडा विकासावर होत आहे.या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन नुकसानग्रस्त श्रीराम व्यायाम शाळेची तातडीने पाहणी करून आवश्यक ते दुरुस्ती काम हाती घेण्यात यावे, दुरुस्तीसाठी विशेष निधी मंजूर करण्यात यावा तसेच नादुरुस्त झालेली व्यायामाची साधने नव्याने उपलब्ध करून देण्यात यावीत अशी मागणी युवकांकडून होत आहे.

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेली ही व्यायाम शाळा पुन्हा सुरू झाल्यास युवकांना सुरक्षित आणि शिस्तबद्ध वातावरणात व्यायामाची संधी मिळेल, तसेच व्यसनमुक्त, सक्षम आणि क्रीडाप्रेमी पिढी घडविण्यास मदत होईल, असे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे. व्यायाम शाळेची वेळीच दुरुस्ती न झाल्यास युवकांची उमेद खचण्याची आणि क्रीडा संस्कृतीला मोठा धक्का बसण्याची भीती व्यक्त होत आहे.

# रिसोड येथे पर्यावरणं शिक्षण कार्यक्रमांतर्गत सीड बॉल निर्मिती कार्यशाळेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी/ रणजितसिंह ठाकुर :** तंत्रज्ञान विकास तसेचं आधुनिकतेच्या नावाखाली होत असलेल्या विकासकामामूळे पर्यावरणाचा अतोनात र्हास झाला आहे नव्हे तर आजरोजी सुध्दा होत आहे हि येणार्या पिढी करीता फार चिंतनीय समस्या आहे.पण हि येऊ घातलेली गंभीर समस्या पर्यावरण प्रेमींच्या लक्षात येताचं त्यांनी विविध मार्गाने तसेच सामाजिक घटकांच्या माध्यमातून पर्यावरण समतोल साधण्याचा प्रयत्न करीत आहेत हि उल्लेखनीय बाब आहे. पर्यावरण समतोल साधण्याचा सर्वात महत्वाचा घटक म्हणजे वृक्षारोपण करून त्याचे संवर्धन करणे होय.ह्या दृष्टीकोनातून सामाजिक वनीकरण विभाग वाशिम,परिक्षेत्र रिसोड ह्यांनी विविध विद्यालयामध्ये 'सीड



बॉल' निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करून विद्यार्थ्यांना वृक्ष लागवडीस प्रोत्साहीत केले. कार्यक्रमाकरिता अरविंद ईढोळे लागवड अधिकारी,निर्मला डिघोळे वनपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र रिसोड,कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक वृक्षमित्र गजानन मुलंगे तसेच विविध विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय भांडेकर,विठ्ठल सारोळकर,अरविंद ठाकरे प्रामुख्याने उपस्थित होते.गजानन मुलंगे ह्यांच्या मार्गदर्शनानुसार "*सीड बॉल*" तयार करतांना 70% काळी माती व 30% गुरांच्या शेणापासून ओले मिश्रण तयार करण्यात आले.तयार केलेल्या मिश्रणापासून छोटे-छोटे गोळे तयार करून त्यांच्या केंद्रापर्यंत छिद्र पाडून त्यामध्ये उपलब्ध 'बी' टाकून ते पुर्ववत चिखलाने बूजविण्यात आले. सदर्हु गोळे सावलीत सूकविल्यास आपणास हवे असणारे 'सीड बॉल' तयार होतात.पावसाळयाच्या प्रारंभी अर्थात जुलै महिन्यामध्ये पर्यटन करतांना रस्त्याच्या कडेला, माळरानं किंवा डोंगरदर्या इत्यादी ठिकाणी 'सीड बॉल' भिरकावल्यास ज्या ठिकाणी ते स्थिरावतील त्या ठिकाणी पावसामुळे माती विरघळून वृक्ष निर्मिती होईल.विद्यार्थ्यांच्या माध्यमातून जास्तीत-जास्त वृक्ष लागवड होण्याच्या दृष्टिकोनातून येत्या जून महिन्यापर्यंत सर्वात जास्त 'सीड बॉल' तयार करणार्या प्रथम तीन विद्यार्थ्यांना सामाजिक वनिकरण विभाग रिसोड यांच्या वतीने प्रशस्ती पत्र व पुरस्कार जाहीर करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरीता रमेश कदम,प्रमोद जावळे वनरक्षक तसेचं तंत्रस्नेही अक्षय आडे ह्यांनी मोलाचे सहकार्य केले.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# फसवणुकी प्रकरणी चौघाविरोधात गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** नगररचना विभाग यांच्याकडील मंजूर आदेशाप्रमाणे बांधकाम न करता बनावट कागदपत्रांचा वापर करून बनावट आर्किटेक्ट नकाशा तयार करून रीस येथे हेरंब गुरुकृपा कॉम्प्लेक्स येथे बेकायदेशीर फ्लॅट बांधून त्या फ्लॅटची विक्री केली आणि ३३ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी बांधकाम व्यावसायिक दीपक रामचंद्र जोशी, अतुल अनिल दिघे तसेच जागामालक सत्विंदर सोहन सिंग पाबला आणि प्रशांत बाजीराव गायकवाड यांच्या विरोधात २२ डिसेंबर रोजी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींना अटक करण्याची मागणी फिर्यादी संजय घाडी यांनी केली आहे.

संजय घाडी यांनी २०१८ मध्ये हेरंब सोसायटी, रीस या ठिकाणी फ्लॅट घेतला. २०२० मध्ये सोसायटी स्थापन झाली. जुलै २०२२ मध्ये डी विंगच्या कॉलम आणि पिल्लर याला क्रॅक गेल्याने इमारत कोसळण्याचा धोका निर्माण झाला. त्यानंतर बिल्डरने कॉलम आणि पिलर याला जॅकेटिंग करून चॅनलचा सपोर्ट दिला. पुन्हा २०२५ मध्ये कॉलमला तडा गेल्याचे दिसून आले. बिल्डिंगचे बांधकाम निकृष्ट असल्याने घाडी यांनी फ्लॅट विक्री करण्याचा निर्णय घेतला. यावेळी एक इसम फ्लॅट खरेदी करण्यासाठी आला. त्याला घाडी यांनी कागदपत्र दिले. यावेळी कर्जासाठी बँकेमध्ये कागदपत्र दिले असता ब्लू प्रिंट आणि खरेदी खतामध्ये जोडलेला आर्किटेक नकाशा यात तफावत असल्याने कर्ज प्रकरणास बँकेने नकार दिला. तसेच डी विंग मध्ये असलेले फ्लॅट वन आर के असे मंजूर असताना बांधकाम व्यावसायिकाने बेकायदेशीररित्या वन बीएचके असे बांधकाम केले असल्याचे घाडी यांना दिसून आले. फसवणूक झाल्यानंतर दीपक जोशी, अतुल दिघे, सत्विंदर पाबला, प्रशांत गायकवाड यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील एका आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. उर्वरित आरोपींना अटक करण्याची मागणी संजय घाडी यांच्याकडून करण्यात आली आहे.

# माणसा, माझं घर देतोस का?

## ज्ञानदीप विद्यालयात बिबट्याच्या 'घरवापसी'चा टाहो!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** "माझा अधिवास तुम्ही हिरावून घेतला, माझी जंगलं तोडली, आता मी राहायचं कुठे? कुणी घर देता का घर?" असा केविलवाणा टाहो फोडत, हातात पिंजरा घेऊन फिरणाऱ्या बिबट्याने सिल्लोडकरांच्या काळजाचा ठोका चुकवला. निमित्त होते, येथील ज्ञानदीप प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात सादर झालेल्या 'कुणी घर देता का घर' या अत्यंत प्रभावी लघुनाटिकेचे.

सध्या संपूर्ण राज्यात बिबट्याचा वावर आणि मानवी वस्तीवरील हल्ल्यांचे सत्र वाढल्याने भीतीचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर, अभिनव







प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष तथा शासनाच्या 'मानव-वन्यजीव संघर्ष' समितीचे सदस्य डॉ. संतोष पाटील यांनी स्वतः ही नाटिका लिहून विद्यार्थ्यांच्या मदतीने ती सादर केली. बिबट्या स्वतः पिंजरा घेऊन फिरतोय आणि पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या माणसालाच आता पिंजऱ्यात जेरबंद करण्याची भाषा करतोय, हे दृश्य उपस्थितांना अंतर्मुख करून गेले.

**नाटिकेचा संदेश: संघर्ष नव्हे, सहजीवन हवे!**

केवळ भीती न घालता, बिबट्यापासून संरक्षण कसे करावे आणि निसर्गाचा समतोल कसा राखावा, याचे शास्त्रोक्त मार्गदर्शन यावेळी डॉ. पाटील यांनी केले. "जंगलं वाचली तरच बिबट्या जंगलात राहील, अन्यथा तो अन्नाच्या शोधात तुमच्या दारात येईल," हा कडक इशारा या प्रबोधनातून देण्यात आला. शाळेतील पाच विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवत बिबट्या आणि मानवातील संघर्षाच्या वेदना जिवंत केल्या.

संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव गवळी आणि मुख्याध्यापिका वंदना दिवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी प्राथमिकचे मुख्याध्यापक सतिष बडक यांच्यासह काकासाहेब वाढेकर, अस्लम तडवी, गोकुळ सिनकर, संगीता बोर्डे, गणेश व्यवहारे, विश्वनाथ लुटे, अर्चना देशपांडे, संगीता वाकडे, विजय चापे, सुनील दुसाने आदी शिक्षकांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांच्या मनात पर्यावरणाप्रती संवेदनशीलता निर्माण करणारा हा उपक्रम सध्या शहरात चर्चेचा विषय ठरत आहे.

# चिमुकल्यांच्या प्रयोगातून उलगडले विज्ञानाचे विश्व!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** हमदर्द चॅरिटेबल ट्रस्ट संचलित नॅशनल इंग्लिश स्कूल येथे भव्य विज्ञान प्रदर्शन उत्साहात पार पडले. या प्रदर्शनाचे उद्घाटन गट शिक्षणाधिकारी रमेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी पर्यावरण, तंत्रज्ञान आणि गणितावर आधारित नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

याप्रसंगी शिक्षण विस्तार अधिकारी राजीव फुसे, गट समन्वयक रामचंद्र मोरे,



आयएसओ समन्वयक प्रा. प्रशांत जोशी, बाल विकास प्रकल्प अधिकारी व्ही. डी. कवाल, वन परिक्षेत्र अधिकारी संतोष दोडके यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच संस्थेचे अध्यक्ष इकबाल अहमद, संचालक शमसुलहक, शेख जियाउलहक, अमीर हमजा, शेख मोइनुलहक, माजी सरपंच सय्यद नासेर हुसैन, संजय जाधव, अरुण चव्हाण, शेख सलीम, मारोती गव्हाणे, डॉ. आसिम अहमद व डॉ. काशिफ या मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या प्रयोगांचे कौतुक केले.प्रदर्शनात मॅथ सिटी, नैसर्गिक शेती, ऊर्जा संवर्धन, वायू प्रदूषण, ३डी होलोग्राम, ऑटोमॅटिक वॉटर डिस्पेंसर आणि धरण ओव्हरफ्लो अलार्म यांसारखे प्रकल्प लक्षवेधी ठरले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक शेख अफसर, जहीर अंसारी, गुलाम खुसरो व सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले

# बेकायदेशीरपणे शासकीय शुल्क वसूल करणाऱ्या गुंफलवार वर कारवाईची मागणी


**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक/नागपूर विभाग :** नागपूर विभागात बेकायदेशीर वजन काट्यांद्वारे सर्वसामान्य नागरिकांची तसेच शासनाची मोठ्या प्रमाणावर फसवणूक होत असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. यासंदर्भात वैधमापन शास्त्र विभागाकडे दाखल करण्यात आलेल्या तक्रारीत मे. ब्लॅक संसुई वेट मशीनचे प्रोप्रायटर श्री. अभिषेक गुंपलवार यांचे नाव थेट नमूद करण्यात आले असून, त्यांच्यावर गंभीर आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप करण्यात आले आहेत. तक्रारीनुसार, श्री. अभिषेक गुंपलवार यांच्या मालकीच्या मे. ब्लॅक संसुई वेट मशीन कंपनी मार्फत नियमबाह्य व अवैध वजन काट्यांचे उत्पादन व विक्री दुरुस्ती करण्यात येत आहे. हे वजन काटे वैधमापन शास्त्र कायदा 2009 व नियम 2011 चे उल्लंघन करणारे असल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, या वजन काट्यांच्या पडताळणी (Verification) व मुद्रांकन (Stamping) शुल्काची रक्कम शासनाच्या तिजोरीत जमा न करता ती परस्पर लाटण्यात आल्याचा गंभीर आरोप तक्रारीत नमूद करण्यात आला आहे.। प्रकारामुळे एकीकडे शासनाची आर्थिक फसवणूक झाली असून, दुसरीकडे चुकीच्या वजन काट्यांमुळे ग्राहकांची थेट लूट व फसवणूक होत असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. हा प्रकार केवळ प्रशासकीय निष्काळजीपणाचा नसून, आर्थिक घोटाळा व संगनमताचा संशय निर्माण करणारा असल्याचेही तक्रारीत नमूद आहे.तक्रारीत पुढे असा आरोप करण्यात आला आहे की, या गंभीर गैरप्रकाराकडे वैधमापन शास्त्र विभागातील काही अधिकारी व निरीक्षक जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असून, दोषींवर कारवाई न करता त्यांना अप्रत्यक्ष संरक्षण दिले जात आहे. त्यामुळे शासनाच्या महसुलाचे मोठे नुकसान होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.तक्रारदारांनी मागणी केली आहे की, मे. ब्लॅक संसुई वेट मशीनचे प्रोप्रायटर श्री. अभिषेक गुंपलवार यांच्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई करून बेकायदेशीर वजन काटे जप्त करण्यात यावेत, पडताळणी व मुद्रांकन शुल्काच्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करावी, संबंधित परवाने रद्द करावेत तसेच शासनाच्या तिजोरीत झालेल्या नुकसानीची वसुली करण्यात यावी.दरम्यान, या प्रकरणामुळे वैधमापन शास्त्र विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, प्रशासन या गंभीर आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणात काय ठोस पावले उचलते याकडे नागपूर विभागासह संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# पालोद परिसरात जिओचे नेटवर्क 'गुल'; डिजिटल इंडियाचा पुरता बोजवारा; संतप्त ग्राहकांचा आंदोलनाचा पवित्रा

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** गेल्या काही दिवसांपासून पालोदसह परिसरातील अन्वी, मंगरूळ, चांदापूर आणि चिंचपूर या गावांमध्ये जिओ कंपनीचे नेटवर्क पूर्णपणे गायब झाले आहे. 'देश बदल रहा है'च्या गप्पा मारल्या जात असताना प्रत्यक्षात मात्र ग्रामीण भागात साधे फोन कॉल लागणेही कठीण झाले आहे. टॉवर असूनही सिग्नल मिळत नसल्याने या भागातील डिजिटल व्यवहार ठप्प झाले असून, संतप्त ग्राहकांनी आता




कंपनीच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे.

आजच्या युगात मोबाईल आणि इंटरनेट ही चैनीची वस्तू नसून गरज बनली आहे. मात्र, पालोद परिसरातील हजारो जिओ ग्राहकांसाठी हे सिमकार्ड आता केवळ नावापुरतेच उरले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या भागात रेंजचा मोठा लपंडाव सुरू आहे. कधी सिग्नल पूर्णपणे गायब होतो, तर कधी कॉल लावताच 'नेटवर्क बिझी'चा संदेश येतो. यामुळे ऑनलाइन बँकिंग, विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि शासकीय कामांवर मोठा परिणाम झाला आहे. विशेष म्हणजे, अन्वी, मंगरूळ आणि चिंचपूर सारख्या भागात तर तासनतास रेंज नसल्याने संपर्क क्षेत्राच्या बाहेर राहण्याची वेळ ग्रामस्थांवर आली आहे.

**डिजिटल व्यवहारांना 'ब्रेक'**

सध्या सर्वत्र युपीआय (UPI) आणि ऑनलाइन पेमेंटचा बोलबाला आहे. मात्र, नेटवर्कअभावी येथील व्यापाऱ्यांना आणि ग्राहकांना आर्थिक व्यवहार करताना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. "हातात महागडा मोबाईल असूनही नेटवर्क नसल्याने तो एखादा खेळण्यासारखा वाटतोय," अशी संतप्त प्रतिक्रिया संदीप पंडित या युवकाने दिली.

**विद्यार्थी आणि नोकरदारांचे हाल**

अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहेत, तर काही तरुण 'वर्क फ्रॉम होम' करत आहेत. नेटवर्क नसल्याने या सर्वांचे शैक्षणिक आणि आर्थिक नुकसान होत आहे. वारंवार तक्रारी करूनही जिओ कंपनीचे स्थानिक तांत्रिक विभाग याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत.

**आंदोलनाचा इशारा**

कंपनी केवळ रिचार्जचे दर वाढवण्यात मग्न आहे, मात्र सेवा देण्याच्या बाबतीत हात वर करत आहे. जर येत्या दोन-तीन दिवसांत पालोद आणि परिसरातील नेटवर्कची समस्या कायमस्वरूपी सुटली नाही, तर परिसरातील तरुण आणि ग्राहक जिओ टॉवरवर धडक देऊन तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा अन्वी, मंगरूळ आणि चांदापूर येथील ग्रामस्थांनी दिला आहे. आता यावर कंपनी प्रशासन काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# रामदासजी आठवले साहेब व राहुल भैय्या लोणीकर यांच्या वाढदिवसानिमित्त जि. प कन्या शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया राष्ट्रीय अध्यक्ष तथा सामाजिक न्याय मंत्री भारत सरकार श्री रामदासजी आठवले साहेब व प्रदेश सचिव भारतीय जनता पार्टी राहुल भैय्या लोणीकर यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक 26 डिसेंबर रोजी जिल्हा परिषद कन्या शाळा आष्टीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.मागील सतत अकरा वर्षापासून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया तालुका अध्यक्ष राहुल जी कांबळे व त्यांचे सहकारी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप चे काम करत आहेत.या वेळी राहुल भैय्या लोणीकर यांचा सत्कार करून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.या वेळी कार्यक्रम चे आयोजक राहुल कांबळे, पवन आव्हाड ,गजानन लोणीकर, तुकाराम सोळंके , केंद्र प्रमुख राम सोळंके सर,कन्या शाळेचे सर्व शिक्षक वृंद,अर्जुन थोरात, रवि सोळंके, अमोल जोशी, रमेश थोरात, मारोती थोरात सह सर्व भाजप व रीपाई चे कार्यकर्ते उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोविंद सर यांनी केले

# माजी विध्यार्थी 25 वर्षांनंतर आले एकत्र माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना दिला उजाळा

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील कालठण नं१ येथील उत्कर्ष विद्या मंदीरमधील १९९९ -२००० सालच्या आठवी नववी दहावीच्या बॅचच्या विद्यार्थ्यांचा तब्बल २५ वर्षानंतर स्नेहमेळावा उत्साहात पार पडला.यावेळी खेळीमेळीच्या वातावरणात जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला.माजी मुख्याध्यापक खुपसे सर अध्यक्षस्थानी उपस्थित होते सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींनी शिक्षकांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. माजी विद्यार्थ्यांकडून शाळेला सांऊड सिस्टीम भेट देण्यात आली तसेच सर्व शिक्षकांना सरस्वतीची मुर्ती भेट देण्यात




आल्या. यावेळी शिक्षकांनी जीवन जगत असताना सर्वांनी आपल्या कामातून वेळ काढून गेट-टुगेदर असे कार्यक्रम घेऊन आपले बालपणीच्या आठवणीनां उजाळा दिला पाहिजेत असे मत व्यक्त केले. बरेच विध्यार्थी व्यवसाय किंवा नोकरी करत असून त्यातील भरपूर विद्यार्थी शेती करत असल्यामुळे शेतकऱ्यांनी स्वतः:ला मालक समजणे आवश्यक आहे शेतकरी हा सर्व जगाचा पोशिंदा आहे,असे त्यांनी यावेळी सांगितले त्यानंतर सर्व शिक्षकांनी विविध विषयावर मोलाचे मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांनां जुन्या आठवणी करून त्यांना उजाळा देण्यात आला या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकेश गटकूळ यांनी केले तर नियोजन चंद्रकांत मांढरे,विजय पाडुळे डॉ लक्ष्मण सपकळ तात्यासाहेब कोळेकर, बाळासाहेब कोळेकर,नागेश जाधव,सुरेखा बनकर,स्वाती सातव,राणी जगताप,आशा मांढरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सर्वच मुला मुलींनी परीश्रम घेतले त्या बदद्ल सगळयांचे आभार मानले मुला मुलींना आठवण म्हणून स्वामी समर्थ ची मुर्ती भेट देण्यात आली यावेळी कार्यक्रमाला बनकर सर ढावरे सर मोमीन सर पन्हाळकर सर शिंदे सर जाधव व्हि टि कोल्हे सर मदने सर काळेल सर राजेंद्र जगताप सर जाधव के.एस.जगताप ( लावर) मॅडम देशपांडे मॅडम कोल्हे मॅडम सुर्वे सर जावळे गुरुजी हनुमंत जगताप सर व सुरेश जगताप शिपाई यांचा सरस्वती ची मुर्ती देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# डोंगरगाव गटामध्ये निवडणुकीपूर्वीच 'रणधुमाळी'; दिग्गज भिडणार, राजकीय वातावरण तापले!

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांचे बिगुल अद्याप अधिकृतपणे वाजले नसले, तरी सिल्लोड तालुक्यातील डोंगरगाव जिल्हा परिषद गटामध्ये राजकीय हालचालींनी कमालीचा वेग घेतला आहे. आगामी निवडणुकांचे रणशिंग फुंकण्यापूर्वीच या भागात 'साम, दाम, दंड, भेदा'चे राजकारण सुरू झाले असून, मतदारसंघातील वर्चस्व सिद्ध करण्यासाठी इच्छुकांनी कंबर कसली आहे. विशेष म्हणजे, या गटात प्रस्थापित आणि नव्या दमाच्या नेत्यांमध्ये जोरदार रस्सीखेच पाहायला मिळत असून, इच्छुकांच्या गाठीभेटी आणि सोशल मीडियावरील प्रचाराने ग्रामीण भागातील वातावरण चांगलेच तापले आहे.

**दिग्गजांच्या नावांची चर्चा; चुरस वाढली**

डोंगरगाव गटामध्ये सध्या महायुतीमधीलच घटक पक्षांमध्ये मैत्रीपूर्ण लढत की अंतर्गत संघर्ष, याबाबतची चर्चा घराघरांत पोहोचली आहे. या जागेसाठी शिवसेना (शिंदे गट) आणि भाजप या दोन्ही पक्षांनी आपली ताकद पणाला लावली आहे. यात सर्वात आघाडीवर असलेले नाव म्हणजे शिवसेना शिंदे गटाचे (सेवानिवृत्त विभागीय निबंधक)

देविदास पालोदकर. आपल्या प्रशासकीय अनुभवाच्या शिदोरीवर आणि दांडगा जनसंपर्क यांच्या जोरावर पालोदकर यांनी मतदारसंघात बांधणी सुरू केली असून, त्यांच्या नावाची चर्चा सध्या जोरात आहे.

दुसरीकडे, भारतीय जनता पक्षानेही या जागेवर आपला दावा मजबूत केला आहे. भाजपचे



प्रदेश सचिव सुरेश बनकर हे स्वतः या मैदानात उतरण्यास इच्छुक असल्याचे समजते. बनकर यांच्या रूपाने भाजप एका बड्या नेत्याला मैदानात उतरवून ही जागा आपल्या खिशात घालण्याच्या तयारीत आहे. यासोबतच, राजकारणातील अनपेक्षित वळण म्हणून पालोद येथील उपसरपंच मच्छिंद्र पालोदकर यांच्या नावाचीही मोठी चर्चा आहे. नुकताच शिंदे गटातून भाजपमध्ये प्रवेश केलेले मच्छिंद्र पालोदकर हे तरुण चेहरा आणि स्थानिक नेटवर्किंगच्या जोरावर प्रस्थापितांना तगडे आव्हान देण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**आश्वासनांची खैरात आणि जनसंपर्कावर भर**

निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच गावागावांतील पारावर आता फक्त राजकीय गणिते मांडली जात आहेत. विकासकामांचे नारळ फोडण्यापासून ते वैयक्तिक सुख-दुःखाच्या कार्यक्रमांत हजेरी लावण्यापर्यंत इच्छुकांची लगबग वाढली आहे. "निवडणूक नसती तरच हे दिसले असते का?" असा खोचक सवाल सामान्य मतदार विचारत असला, तरी सध्या तरी डोंगरगाव गटामध्ये राजकीय मशागत अंतिम टप्प्यात आली आहे.

सत्ताधारी गटातील अंतर्गत गटबाजी आणि बदललेली राजकीय समीकरणे पाहता, ही निवडणूक केवळ विकासाच्या मुद्द्यावर न राहता प्रतिष्ठेची ठरणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

## भंडारा जिल्हा संविधान बचाव संघर्ष समितीमार्फत महाराष्ट्राचे राज्यपाल यांना जिल्हाधिकारी मार्फत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकी संदर्भातील राज्यपालांनी अध्यादेश मागे घ्यावे

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे/भंडारा :** आज दिनांक 26 डिसेंबर 2025 ला संविधान बचाव संघर्ष समिती भंडारा मार्फत महाराष्ट्राचे राज्यपाल यांना जिल्हाधिकारी भंडारा यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले. याबाबत सविस्तर वृत्त असे की, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत संदर्भात एखाद्या उमेदवाराने निवडणूक अधिकाऱ्याकडे अर्ज सादर केला तर तो मंजूर किंवा नामंजूर करण्याचा अधिकार संबंधित निवडणूक अधिकाऱ्याला असेल त्याला न्यायालयात दादमागता येणार नाही तो अध्यादेश राज्यपाल महोदय यांनी रद्द करण्यात यावा याकरिता निवेदन देण्यात आले. निवडणूक निर्णय



अधिकारी हे शेवटी सरकारी कर्मचारी असतात .विशिष्ट उमेदवाराच्या अर्ज स्वीकारणे व फेटाळणे याबाबत सरकारमध्ये राजकीय पक्षांकडून त्यांच्यावर दबाब देण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा वेळी आपल्यावर अन्याय झाला अशी समज झालेल्या उमेदवाराला न्यायालयात दाद मागता येणार होती. मात्र हे विधेयक पास झाल्यास उमेदवारास न्यायालयात दादच मागता येणार नाही व सत्ताधारी पक्षाचे लोक या कायद्याचा आधार घेऊन विरोधकांचे उमेदवारी अर्ज मंजूर करण्याकरता निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यावर दबाब आणून उमेदवारी अर्ज नामंजूर करण्यास भाग पाडतील .सदर निर्णय हा लोकशाही विरुद्ध असून संविधानाने दिलेल्या अन्यायाच्या विरुद्ध दाद मागण्याचा मूलभूत अधिकाऱ्याच्या विरुद्ध आहे. त्यामुळे सदर अध्यादेश मंजूर करण्यात येऊ नये. निवेदन देताना सदानंद इलमे, चंद्रशेखर टेंभुर्णे, आसित बागडे ,डॉ. बाळकृष्ण साळवे, राजेश मडामे ,ग्यानचंद जांभुळकर, अजबराव चिचामे ,वामनराव गोंधळे ,अमृत बनसोड ,दिलीप वानखेडे, हिवराज उके,इंजिनीयर रूपचंद रामटेके, श्रीकृष्ण पडोळे, विश्वनाथ नंदागवळी ,बंडू फुलझेले,डॉ. रवींद्र जनबंधू ,हंसराज वैद्य, संजीव भांबोरे प्रामुख्याने उपस्थित होते.

# नफरवाडीचे सार्थक तांबे व अजय मंडलिक भारतीय सैन्य दलात भरती

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) :** लहानसं गाव, साधी घरं, शेतीवर अवलंबून असलेली कुटुंबं आणि मर्यादित साधनं असून ही मोठी स्वप्नं उराशी बाळगून पाटोदा तालुक्यातील नफरवाडी या गावातील सार्थक तुकाराम तांबे आणि अजय किसन मंडलिक या दोन तरुणांनी भारतीय सैन्य दलात भरती होऊन ग्रामीण भागातूनही देशसेवेच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचता येते हे ठामपणे सिद्ध केले आहे. शेतकरी कुटुंबातील अत्यंत सामान्य आर्थिक परिस्थितीत वाढलेल्या या तरुणांचा प्रवास संघर्षमय असला तरी त्यांनी परिस्थिती पुढे हार मानली नाही. पहाटे शेतातील काम, त्या नंतर सातत्यपूर्ण सराव, धावणे, कठोर व्यायाम आणि शिस्तबद्ध जीवनशैली या जोरावर त्यांनी डिसेंबर महिन्यात पुणे येथे झालेल्या भारतीय सैन्य दलाच्या भरती प्रक्रियेत जिद्दीने सहभाग घेतला आणि अखेर यश मिळवले. या मध्ये सार्थक तांबे याची भारतीय सैन्य दलाच्या जीडी (जनरल ड्यूटी) विभागात तर



अजय मंडलिक याची तांत्रिक विभागात निवड झाली असून दोघे ही सैन्य प्रशिक्षणासाठी पुणे येथे रवाना झाले आहेत. त्या मुळे नफरवाडी गावात आनंद, अभिमान आणि समाधानाचे वातावरण पसरले आहे. विशेष म्हणजे, नुकतेच पाटोदा तालुक्यातील चुंबळी येथील काही तरुणांचीही भारतीय सैन्य दलात निवड झाल्याने तालुक्यात देशसेवेची सकारात्मक लाट निर्माण झाली असून, ग्रामीण तरुणांचा कल सैन्यदल, पोलीस दल आणि राष्ट्रसेवेच्या दिशेने वेगाने वाढत असल्याचे आशादायी चित्र दिसत आहे. या यशातून व्यसनांपासून दूर राहून सातत्यपूर्ण मेहनत, शारीरिक तंदुरुस्ती आणि आत्मविश्वासाच्या जोरावर कोणते ही स्वप्न साकार करता येते, असा ठोस संदेश मिळत असून नफरवाडी व चुंबळी सारख्या गावांतील तरुण आज इतरांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत. या दोन्ही तरुणांच्या यशाबद्दल आष्टी/पाटोदा/शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांनी त्यांचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या असून ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील तरुण देशसेवेचा मार्ग स्वीकारत आहेत ही अत्यंत अभिमानाची बाब असल्याचे नमूद केले आहे.

## पालोद आरोग्य केंद्रात औषधांचे 'स्मशान'; गरिबांच्या जिवाशी खेळून सरकारी तिजोरीवर डल्ला!

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/सिल्लोड :** तालुक्यातील पालोद येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा कारभार सध्या वाऱ्यावर असून, येथे चक्क शासकीय औषधांचा बेजबाबदारपणे निपटारा केल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. गोरगरीब जनतेच्या उपचारासाठी आलेली औषधे उघड्यावर फेकून आरोग्य विभागाने नागरिकांच्या जीवाशी खेळ मांडला असून, या गंभीर निष्काळजीपणाबद्दल दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

**नेमका प्रकार काय?**

पालोद आरोग्य केंद्रात काही जागरूक नागरिकांनी भेट दिली असता, केंद्रातील संबंधित कर्मचारी आपल्या कर्तव्यावर अनुपस्थित असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले. मात्र, त्याहूनही भीषण दृश्य केंद्राच्या मागील बाजूस पाहायला मिळाले. शासनाकडून पुरविण्यात आलेली महागडी औषधे, ज्यांची मुदत संपली आहे, ती शास्त्रीय पद्धतीने नष्ट करण्याऐवजी कचऱ्यासारखी उघड्यावर फेकून देण्यात



आली होती.

औषधांचा अशा प्रकारे उघड्यावर निपटारा करणे हा 'जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६' आणि 'Drugs and Cosmetics Act, १९४०' नुसार गंभीर गुन्हा आहे. या औषधांमुळे परिसरात संसर्ग पसरण्याची भीती निर्माण झाली असून, स्थानिक नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. हा केवळ निष्काळजीपणा नसून शासकीय मालमत्तेची केलेली लूट आणि गुन्हेगारी स्वरूपाचा कट असल्याचे बोलले जात आहे.

**पुरावे सादर; अटकेची टांगती तलवार**

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तक्रारदाराने घटनास्थळाचे फोटो, व्हिडिओ आणि GPS लोकेशनसह सर्व ठोस पुरावे जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केले आहेत. संबंधित वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांविरोधात भारतीय दंड संहिता (IPC) कलम २६९, २७०, ३३६ (जीवितास धोका निर्माण करणे), ४०९ (शासकीय विश्वासघात) आणि १२०(ब) अंतर्गत फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

"गोरगरीब रुग्णांना औषधे मिळत नसताना, दुसरीकडे शासकीय औषधे अशी उघड्यावर फेकली जाणे संतापजनक आहे. या प्रकरणातील दोषींना पाठीशी न घालता त्यांच्यावर तात्काळ निलंबनाची आणि फौजदारी कारवाई व्हायला हवी अशी मागणी स्थानिक नागरिक व सामाजिक संघटना करत आहे.

आता जिल्हा आरोग्य प्रशासन या 'पालोद' प्रकरणातील 'पांढरपेशी' दोषींवर काय कारवाई करते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## राज्यस्तरीय १९ वर्षातील टेनिस क्रिकेट स्पर्धेमध्ये नाशिक संघाला द्वितीय पारितोषिक

**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक/ विनोद गायकवाड :** टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र यांच्या वतीने आयोजित पाचवी १९ वर्षांखालील मुलांची व मुलींची राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा म्हसवड येथे १८ ते २० डिसेंबर या कालावधीत अतिशय यशस्वीरीत्या पार पडली. टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र व टेनिस क्रिकेट असोसिएशन सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेचे उद्घाटन टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र व टेनिस क्रिकेट असोसिएशन इंडिया यांच्या सचिव मीनाक्षी गिरी, सहसचिव चंद्रकांत तोरणे, उपाध्यक्ष विलास गिरी तसेच महाराष्ट्र वुमन डायरेक्टर धनश्री गिरी यांच्या हस्ते करण्यात आले. या राज्यस्तरीय स्पर्धेत मुलांच्या एकूण ३० संघांनी तर मुलींच्या ४ संघांनी सहभाग नोंदवला होता. मुलांचा अंतिम सामना रत्नागिरी विरुद्ध नाशिक मनपा यांच्यात होऊन रत्नागिरी संघाने उत्कृष्ट खेळ करत विजयश्री मिळवला तर नाशिक संघाला




उपविजययी पदावर समाधान मानावे लागले,

नाशिक संघाकडून प्रथमेश गणेश देशमुख,,सिद्धांत राहुल गांगुर्डे ,निखिल जोतमल चेव्हाण ,अभिनव विष्णू लोखंडे ,ऋत्विक रामदास महाले ,देवांश सचिन सोनवणेसार्थक केदु आहेर ,ओम खंडू भदाणे, ,आदित्य शरद गांगुर्डे, ,करण संतोष गवे, ,युवराज विष्णू फसाळे, मुली संघा,आकांक्षा अनिल वडजे ,अनुष्का प्रमोद खरोटे ,वैष्णवी रमेश जगताप ,संस्कृती हेमंत आहेर यांनी

उत्कृष्ट खेळ करत व नाशिक संघाला उपविजेयी पदमिळून दिल्याबद्दल भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महासचिव मीनाक्षी गिरी महाराष्ट्र उपाध्यक्ष विलास गिरी, वुमन डायरेक्टर धनश्री गिरी नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशनचे सचिव व विभाग अध्यक्ष विलास गायकवाड, धनंजय लोखंडे ,प्रशांत आढाव,अनिकेत भवर,मुकेश सोनवणे संदीप बोरसे,यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिला मार्गदर्शक म्हणून संदीप बोरसे यांनी काम बघितले.

## तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये तीन कारखान्यांना भीषण आग

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) :** तळोजा औद्योगिक वसाहतीत भीषण आगीची घटना घडली. येथील तळोजा औद्योगिक वसाहतमधील तीन कारखान्यांना एकाच वेळी आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. रात्री साडेनऊच्या सुमारास लागलेली ही आग पहाटे साडेपाच वाजेपर्यंत आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाला शर्थीचे प्रयत्न करावे लागले. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी कारखान्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

तळोजा औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्रमांक बी-42 वरील विघ्नहर्ता कंपनीमध्ये अगरबत्ती निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्यारसायनांची सुमारे 150 पिंपे साठवण्यात आली होती.

या पिंपांमधील सॉल्व्हन्ट रसायनांनी अचानक पेट घेतल्याने भीषण स्फोट झाले आणि आगीने उग्र स्वरूप धारण केले. स्फोटाच्या तीव्रतेमुळे कारखान्यातील लोखंडी पत्रे तुटून थेट रस्त्यावर कोसळली. उडालेल्या रसायनांमुळे कंपनीसमोरील रस्ता व गटारांमधून आग पसरत गेली आणि लगतच्या आणखी बी - 41 आणि बी - 43 या दोन कारखान्यांनाही तिचा फटका




बसला.आगीचे लोण वाढत असल्याचे लक्षात येताच कारखान्यातील कामगारांनी प्रसंगावधान राखत तात्काळ बाहेर पळ काढला आणि आपले प्राण वाचवले. तळोजा एमआयडीसी अग्निशमन दलाचे अधिकारी रत्नाकर पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, रात्री सव्वा दहा वाजता आगीची माहिती मिळताच वाहतूक कोंडी असूनही अवघ्या पाच मिनिटांत अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. आगीची तीव्रता पाहता अतिरिक्त बंब मागवण्यात आले. पहाटेपर्यंत सतत पाणी व फोमचा मारा करून अखेर आग नियंत्रणात आणण्यात यश आले. मात्र, रसायनांनी पेट घेतल्यामुळे आग अधिक पसरली असली तरी तिचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेनंतर औद्योगिक वसाहतीतील सुरक्षा व्यवस्था व रसायन साठवणीबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# राष्ट्रीय महामार्गावरील मृत्यूचे सापळे!

## सुरक्षेविना कामे सुरूच; जिल्हाधिकाऱ्यांकडे थेट तक्रार

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे /वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत (एन. एच.ए.आय.161) वाशिम शहरातून होत असलेल्या रस्ते बांधकामांमध्ये मूलभूत सुरक्षेचा बोजवारा उडाल्याने सर्वसामान्य नागरिकांचे प्राण धोक्यात आले आहेत. रस्त्याच्या मध्यभागी उघडे गॅप, पॅचेस, खड्डे, अपुरी प्रकाशव्यवस्था, चेतावणी फलकांचा अभाव आणि बॅरिकेड्स नसल्यामुळे अपघातांची मालिका सुरू असून ही परिस्थिती थेट मृत्यूचे सापळे ठरत असल्याचा गंभीर आरोप करत याबाबत योगेश कुंभेजकर यांच्याकडे कडक शब्दांत तक्रार अर्ज दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार प्रताप नारायण नागरे (आंतरराष्ट्रीय मानवाधिकार सामाजिक न्याय आयोग, पत्रकार सेल) यांनी दिलेल्या अर्जात नमूद केले आहे की, एन.एच.ए.आय.



व संबंधित ठेकेदारांकडून वाहतूक सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवले जात आहेत. अनेक ठिकाणी रस्त्याच्या मध्यभागी अर्धवट गॅप-पॅचेस सोडून दिले असून, रात्रीच्या वेळी ब्लिंकर लाइट्स, फ्लोरोसेंट साईन बोर्ड, रेडियम पट्टे यांचा अभाव असल्याने वाहनचालक दिशाभूल होऊन गंभीर अपघात घडत आहेत.

गावे, शाळा, रुग्णालये व शेतरस्त्यांसाठी सुरक्षित पर्यायी मार्ग उपलब्ध करून दिलेले नाहीत. आपत्कालीन सेवांसाठी (रुग्णवाहिका, अग्निशमन) मोकळा व सुरक्षित मार्ग नसल्याने जीव वाचविण्याची शर्यतही हरली जात आहे. खड्ड्यांत साचलेले पाणी अपघातांचा धोका आणखी वाढवत असून, एन.एच.ए.आय., ठेकेदार आणि स्थानिक प्रशासनातील समन्वयाचा अभाव स्पष्ट दिसतो.

**तक्रारीतील ठळक मागण्या**

– राष्ट्रीय महामार्गावरील कामांची तातडीने संयुक्त पाहणी.

– रस्त्याच्या मध्यभागी सोडलेले सर्व गॅप-पॅचेस तात्काळ बुजवून रस्ता समतल करणे.

– योग्य डायव्हर्जन्स, बॅरिकेड्स, चेतावणी फलक व प्रकाशव्यवस्था बंधनकारक करणे.

– सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ठेकेदारांवर कठोर दंडात्मक कारवाई.

– अपघात झाल्यास संपूर्ण जबाबदारी संबंधित ठेकेदार व यंत्रणांवर निश्चित करणे.

– सर्व सुरक्षा निकष पूर्ण झाल्याशिवाय काम सुरू ठेवण्यास परवानगी न देणे.

**धारदार इशारा**

राष्ट्रीय महामार्ग विकासासाठी आवश्यक असले तरी नागरिकांचे प्राण धोक्यात घालून होणारा विकास स्वीकारार्ह नाही. सुरक्षेकडे दुर्लक्ष करून चालवलेली कामे ही थेट प्रशासनिक बेफिकिरीची पावती आहे.

मोठी दुर्घटना घडल्यास नैतिक व प्रशासकीय जबाबदारी निश्चितच प्रशासनावर येईल, असा कडक इशाराही तक्रारीत देण्यात आला आहे.

या गंभीर विषयाकडे दुर्लक्ष न करता जिल्हा प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## गोवा राज्य निर्मित विदेशी मद्य तस्करीवर कारवाई

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर :** राज्य उत्पादन शुल्क पनवेल शहर विभाग यांनी गोवा राज्य निर्मित विदेशी मद्य तस्करीवर धडक कारवाई केली. यावेळी ६६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

२४ डिसेंबर रोजी निखिल अशोक तामघाडे हा इसम मडगाव छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल तेजस एक्सप्रेसने गोवा राज्य निर्मित



आणि विक्रीसाठी असलेल्या दारुने भरलेली बॅग घेऊन विक्रीच्या उद्देशाने उतरणार असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क पनवेल यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी सापळा रचला. मात्र आरोपीला चाहूल लागल्याने त्याने ती बॅग प्लॅटफॉर्मवर टाकली आणि रेल्वेमध्ये पुन्हा चढून रेल्वे बरोबर पुढे निघून गेला. यावेळी विभागाद्वारे जलद पद्धतीने व्यवहरचना आखण्यात आली आणि योग्य नियोजन करून ठाणे रेल्वे स्टेशन येथे माल घेण्यासाठी आलेला आरोपी पंकज नीलकंठ नेमोडे याला अटक केली. त्यानंतर मुख्य आरोपी निखिल याला छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल मुंबई येथे अटक करण्यात आली. या कारवाईमध्ये ६६ हजार ३२५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदरची कारवाई निरीक्षक भानुदास फणसेकर, दुय्यम निरीक्षक योगेंद्र लोळे, कृष्णा देवरे, योगेश पाडाळे, अजित बडदे, सुरज बुधवाले, ऋषिकेश भोगे यांनी केली.



## थोडक्यात

### तरुण बेपत्ता



**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक तरुण कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.विश्वास कमल शर्मा (18 वर्षे 9 महिने) हा वाकडी येथे राहणारा असून तो कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेला आहे. शरीर बांधाने मजबूत, उंची 5 फुट 6 इंच, रंग गोरा, डोक्याचे केस काळे, डोळे काळे, नाक सरळ, चेहरा गोल, दाढी मिशी नाही, अंगात सफेद रंगाचा टी-शर्ट व लाईट ब्ल्यू कलर व ब्लॅक कलरची जिन्स पॅन्ट, पायात पांढऱ्यारंगाचे बुट असून त्याला इंग्रजी, हिंदी व मराठी भाषा अवगत आहे. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पो.हवा.धनाजी तांडेल यांच्याशी संपर्क साधावा.

### महाआरोग्य शिबिर उपचार आणि मोफत औषधे वाटप कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** सीमा नारायण तांबोळी यांच्या वाढदिवसानिमित्त सूरज हॉस्पिटल, सानपाडा, नारायण लक्ष्मण तांबोळी सामाजिक संस्था नेरे यांच्या संयुक्त विद्यमाने महाआरोग्य शिबिर उपचार आणि मोफत औषधे वाटपाचा कार्यक्रम रविवार ४ जानेवारी २०२६ रोजी जितू फॉर्म, नेरे बस स्टॅन्ड जवळ सकाळी दहा ते दुपारी दोन वाजेपर्यंत करण्यात आले आहे.यावेळी मेंदूचा आजार, मणक्याचे आजार, मानसिक विकार, हृदय विकार, ऑर्थोपेडिक शिबिरातील तपासणी, एक्स-रे यासह मोफत औषधे वाटप करण्यात येणार आहेत. या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन योगेश तांबोळी आणि हर्षला तांबोळी यांनी केले आहे.

### निधन वार्ता



कै. अंबुबाई कोंडीबाराव बोदमवाड यांचे आज दिनांक 26/12/2025, शुक्रवार दुपारी 1.00 वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या जाण्याने बोदमवाड कुटुंबावर तसेच परिसरावर शोककळा पसरली आहे. त्या रामेश्वर कोंडीबाराव बोदमवाड (गुरुजी), विश्वंभर कोंडीबाराव बोदमवाड व दिगंबर कोंडीबाराव बोदमवाड यांच्या मातोश्री होत.त्यांचा अंत्यविधी दिनांक 27/12/2025, शनिवार रोजी दुपारी 3.00 वाजतामेंडका, ता. मुदखेड, जि. नांदेड येथे होणार आहे.कै. अंबुबाई बोदमवाड यांनी आपल्या साधेपणा, प्रेमळ स्वभाव आणि संस्कारांनी कुटुंबाला एकत्र बांधून ठेवले. त्यांचे स्मरण सदैव प्रेरणादायी राहील.ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि शोकाकुल कुटुंबास दुःख सहन करण्याचे बळ प्रदान करो, हीच प्रार्थना.भावपूर्ण श्रद्धांजली.

### 84 हजार रुपयांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** डेबिट कार्ड द्वारे 84 हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात अनोळखी इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.शशिकांत सोनवणे हे सेवानिवृत्त असून खांदा कॉलनीत राहतात. ते बँकेच्या एटीएम सेंटरमध्ये रक्कम काढण्यासाठी गेले. त्यांनी एटीएम मशीनमध्ये टाकून पासवर्ड टाकला. मात्र रक्कम आली नाही. यावेळी सेंटरच्या बाहेर उभा असणारा एक इसम एटीएम सेंटरमध्ये आला आणि तुमचे पैसे निघत नाहीत का तुम्ही दुसरे कार्ड टाका असे बोलला. यावेळी सोनवणे यांनी दुसरे डेबिट कार्ड एटीएम मशीनमध्ये टाकून पासवर्ड टाकला. तरी देखील पैसे आले नाहीत. यावेळी त्या इसमाने तुमची स्लिप खाली पडली असे सांगितले. त्यांनी स्लिप उचलली आणि डेबिट कार्ड घेऊन घरी आले. रात्रीच्या सुमारास त्यांना त्यांच्या बँक खात्यातून 84 हजार रुपये वजा झाल्याचे मेसेज आला. अनोळखी इसमाने स्लिप खाली पडली असे सांगून स्लीप उचलण्यासाठी सोनवणे वाकले असता हातचलाखिने त्याच्याकडील डेबिट कार्ड सोनवणे यांना देऊन त्यांचे कार्ड तो घेऊन गेला आणि त्याद्वारे 84 हजार रुपयांची फसवणूक केल्याचे त्यांच्या लक्षात आले.

### विविध गुन्ह्यातील जप्त वाहनांचा नेरुळ पोलीस ठाण्यातर्फे करण्यात येणार लिलाव

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** पोलीस ठाण्याच्या आवारात विविध गुन्ह्यामध्ये जप्त करण्यात आलेल्या एकूण 10 वाहनांचा लिलाव नेरुळ पोलीस ठाण्याच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. सदर लिलाव हा 27 डिसेंबर 2025 रोजी होणार असून यामध्ये प्रामुख्याने चार चाकी बोलेरो जीप क्र.एमएच-48-एच-3278, मारुती व्हॅगेनर गाडी क्रं.एमएच-43-बीजे-0273, तीन चाकी वाहनांमध्ये बजाज ऑटो रिक्षा क्र.एमएच-43-बीएफ-7253, बजाज ऑटो रिक्षा क्र.एमएच-03-बीए-5689, दुचाकीमध्ये होंडा ॲक्टीव्हा एमएच-05-डीयू-2852, बजाज पल्सर एमएच-43-171, बजाज पल्सर 150 क्र.एमएच-48-झेड-7445, बजाज पल्सर एमएच-03-बीडी-3752, बजाज पल्सर एन 160 क्र. बीआर-07-एवाय-7288 व हिरो होंडा पॅशन क्र.एमएच-12-ईआर-7762 या गाड्यांचा समावेश आहे. अधिक माहितीसाठी नेरुळ पोलीस ठाणे फोन नं.00007702324 किंवा म.पो.हवा. दळवी 9594001462 यांच्याशी संपर्क साधावा.

# बीडमध्ये १५ लाख झाडे कुठं लावली ? याचा हिशोब जिल्हाधिकाऱ्यांनी द्यावा-सयाजी शिंदे

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/मारुती सत्रे :** दि.२५ मे, जून महिन्यांत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि कलेक्टर यांनी सांगितले की, बीडमध्ये १५ लाख झाडं लावली, याची नोंद गिनीज वर्ल्ड बुकमध्ये झाली. कलेक्टरचा सत्कारही करण्यात आला. त्यांनी आता उत्तर द्यावं. कुठेही यांनी बीडमध्ये १५ लाख झाडं लावली हे सांगावं. साताऱ्याहून मी बीडला जात होतो, एक-एक झाडांची मी काळजी घेतली. आता बीडच्या कलेक्टरने सांगावं कौतुक करवून का घेतलं ? १५ लाख झाडांचा हिशोब द्या, ते देऊ शकता का?, असा थेट सवालही त्यांनी उपस्थित केला.



**घरावर बॉम्ब पडल्यासारखी अवस्था झाली-सयाजी शिंदे**

गवत जाळल्यानंतर परत चांगलं उगवतं, अशी गैरसमज आहे. निसर्गाचं प्रचंड नुकसान होतं. पक्षी, सरपटणारे प्राणी, त्यांची पिल्ले, झाडं, रोपटी आगीत जळून खाक होतात. आपल्या घरावर बॉम्ब पडल्यावर काय अवस्था होते. तशी प्राण्यांच्या घरांचीही होते, असं सयाजी शिंदे म्हणाले. बीडमधील घटना अत्यंत दुर्दैवी आहे. २०१७ ला जिथं गवत पण उगवत नव्हतं, ओसाड जागा होती, अशा ठिकाणी झाडं उगवली. रान हिरवंगार झालं. सयाजी शिंदे फक्त निमित्त आहे, पण रान हिरवेगार करण्यामागे अनेकांचं हात आहे, असं सयाजी शिंदे एका वृत्त वाहिनीशी बोलताना म्हणाले.

सिनेअभिनेते सयाजी शिंदेंच्या पुढाकारातून आणि वनविभागाच्या सहकार्यातून बीडच्या पालवन शिवारातील सह्याद्री देवराई प्रकल्पात झाडे लावण्यात आली होती. या प्रकल्पाला बुधवारी रात्री भीषण आग लागली. ओसाड डोंगराला हिरवागार करण्यासाठी सयाजी शिंदे यांनी अथक परिश्रम घेतले. मात्र, डोळयादेखत झाडांची नासधूस झाल्यामुळे सयाजी शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली. बीडमधील घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे, असं सयाजी शिंदे म्हणाले. अत्यंत भयानक होतं हे सगळं, आपल्या घरातलंच कोणतरी जातं, अशी भावना मनात येते. झाडांना गांभीर्यांनी घ्यायला हवे. नागरिक म्हणून आपण सुधारलं पाहिजे. वन खातं आणि पोलिसांनीही याकडे लक्ष द्यायला हवे, असंही सयाजी शिंदे म्हणाले, मे जून महिन्यांत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि कलेक्टर यांनी सांगितले की, बीडमध्ये १५ लाख झाडे लावली, याची नोंद गिनीज वर्ल्ड बुकमध्ये झाली. कलेक्टरचा सत्कारही करण्यात आला, त्यांनी आता उत्तर द्यावं. कुठेही यांनी बीडमध्ये १५ लाख झार्डलावली हे सांगावं, साताऱ्याहून मी बीडला जात होतो, एक-एक झाडांची मी काळजी घेतली. आता बीडच्या कलेक्टरने सांगावं कौतूक करवून का घेतलं ? १५ लाख झाडांचा हिशोब द्या, तेदेक शक्ता का?, असा थेट सवालही त्यांनी उपस्थित केला. झाडांच्या गोष्टी गांभीयनि घ्यायला हवे. झाडांची कत्तल केल्यानंतर दुसऱ्या ठिकाणी आपण झाडे लावतोय का? हे पाहणं महत्त्वाचं आहे.

राज्यकत्यांनी कसे वागावे, हे सर्वस्व त्यांचा प्रश्न आहे. तपोवन वाचलं पाहिजे. तपोवनमधील झाडांची कत्तल करणं चुकीचं आहे. आतापर्यंत २०-३० देवराई झाले आहेत. ४० पर्यंतचा आकडा आहे. जोपर्यंत मी जिवंत आहे. तोपर्यंत मला १०० देवराई तयार करायच्या आहेत, असं माझं स्वप्न आहे, असंही सयाजी शिंदे यांनी म्हटले

## कृष्णा खानसोळे यांची पुण्याच्या फुले फेस्टिवलसाठी काव्य सादरीकरणासाठी निवड

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी विश्वदीप कांबळे :** अर्धापूर तालुक्यातील चोरंबा येथील कृष्णा खानसोळे यांची पुणे येथील एस. एम. जोशी फाउंडेशन सभागृहात दि. २ ते ५ जानेवारी २०२६ या कालावधीत होणाऱ्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवल मध्ये काव्य महोत्सव कार्यक्रमात कविता सादर करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील माध्यमिक शास्त्र संकुलाचा विद्यार्थी कृष्णा आबासाहेब खानसोळे यांची निवड झाली आहे.



क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या उत्तुंग कार्यकर्तुत्वाचा प्रसार व भारतीय संविधानाविषयी जनजागृती करण्याच्या उदात्त हेतुने देशात पहिल्यांदाच पुण्यात आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवलची सुरुवात गतवर्षी झाली.जानेवारीत महोत्सवाचे दुसरे वर्ष असून त्या अंतर्गत कविता सादरीकरणासाठी कृष्णा खानसोळे यांना निमंत्रण मिळाले आहे.

याबाबत आयोजक विजयी वडवेटराव यांनी तसे निवड पत्र दिले आहे . कृष्णा खांनसोळे यांच्या निवडीबद्दल त्यांचे मान्यवरांनी अभिनंदन केले व शुभेच्छा..!

## लग्नाचे आमिष दाखवून घटस्फोटितेवर लैंगिक अत्याचार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** पनवेल येथे राहणाऱ्याएका 39 वर्षीय व्यक्तीने त्याच भागात राहणाऱ्याघटस्फोटित महिलेला लग्नाचे वचन देऊन तिच्यासोबत वेळोवेळी शारीरिक संबंध ठेवून तिच्याकडून 7लाख रुपये उकळून तिची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. राकेश लदबे असे या व्यक्तीचे नाव असून, वाशी पोलिसांनी त्याच्याविरोधात बलात्कार, फसवणुकीसह शिवीगाळ व धमकी देणे कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील पीडित महिला पनवेल भागात आपल्या दोन मुलांसह राहण्यास असून, तिचा घटस्फोट झाला आहे. मार्च 2023 मध्ये आरोपी राकेश लदबे याची पीडित महिलेसोबत ओळख झाली होती. या ओळखीतून त्यांच्यामध्ये प्रेमसंबंध निर्माण झाल्यानंतर अरोपी राकेश लदबे याने पीडित महिलेला लग्नाचे वचन देऊन तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्याने पीडित महिलेला वाशीतील जुहूगाव येथील सरस्वती बिल्डिंगमध्ये नेऊन तिच्यासोबत अनेक वेळा शरीरसंबंध प्रस्थापित केले. याच कालावधीत आरोपीने पीडित महिलेकडून वेगवेगळी कारणे सांगून तिच्याकडून 7 लाख रुपये उकळले.मागील 3 वर्षांपासून आरोपीने पीडित महिलेवर लैंगिक अत्याचार केले. दरम्यानच्या काळात पीडित महिलेने आरोपीकडे पैसे परत मागितले असता, त्याने पैसे परत करण्यास नकार दिला. तसेच पीडित महिलेला शिवीगाळ व मारहाण करीत तिला धमकावले. या प्रकारानंतर पीडित महिलेने दोन दिवसांपूर्वी खांदेश्वर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पोलिसांनी आरोपी राकेश लदबे याच्याविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे. तसेच सदरचा गुन्हा पुढील तपासासाठी वाशी पोलिसांकडे वर्ग केला त्यानुसार पोलिसांनी तपासाला सुरुवात केली आहे.

## खारघरमधील हुक्का पार्लरवर छापा; मॅनेजरसह दोघांना अटक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** तंबाखूजन्य पदार्थांचा वापर करून हुक्का पार्लर चालवण्यास कायद्याने बंदी असूनही खारघर येथील दि स्मोक कॅफेमध्ये सर्रासपणे बेकायदेशीर हुक्का पार्लर चालवले जात असल्याचे उघडकीस आले. खारघर पोलिसांनी या बेकायदेशीर हुक्का पार्लरवर छापा मारून मॅनेजरसह दोघांना अटक केली आहे. तसेच हुक्का ओढण्यासाठी लागणारे साहित्य व वेगवेगळ्या प्रकारचे फ्लेवर जप्त केले आहेत.खारघर सेक्टर-3, बेलपाडा येथील दि स्मोक कॅफेमध्ये बेकायदेशीररीत्या हुक्का पार्लर सुरू असल्याची माहिती खारघर विभागाच्या सहाय्यक पोलीस आयुक्तांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक सुरज जाधव व त्यांच्या पथकाने छापा टाकून कारवाई केली. कॅफेचा मॅनेजर जियाद नासिर बहादुरकर आणि वेटर फहिम निजाम अहमद या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच दोघांना अटक केली आहे.

## माता सुलोचना बोरेले यांचे नवनिर्वाचीत नगराध्यक्ष आतिष बोरेले यांनी घेतला आशीर्वाद ; आमदार राजू तोडसाम यांचा ही सत्कार

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी/ पांढरकवडा :** येथील नगर परिषद निवडनुकीत अतिशय चुर्शीची लढत देत भाजपाचे नगर परिषद निवडनुकीत अध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार आतिष लक्ष्मणजी बोरेले यांनी एकनाथ शिंदे शिवसेना पक्षाचे उमेदवार आणि सलीम खेतानी यांचे खंदे समर्थक डॉ.अभिनय नहाते (पाटिल)यांचा प्रभाव करीत आतिष बोरेले यांनी विजयी मिळविला.

नगर परिषद निवडणुकीच्या झाल्यामुळे आतिष बोरेले यांनी आपल्या मोठ्या आई श्रीमती सुलोचना डालूरामजी बोरेले,यांचा आशीर्वाद जगदंबा निवासस्थान येथे



घेतला आहे.या वेळी आर्णी - केळापुर मतदार संघाचे लोकप्रीय आमदार श्री राजू नारायणजी तोडसम यांनी सुद्धा आशीर्वाद घेतला आहे,आतिष बोरेले यांचा व आमदार राजू तोड़साम यांचे आई सुलोचना बोरेले यांनी फूलमाळा घालून मिष्टान खाऊ घालून आरती ओवाळून सत्कार केले आहे.

सुलोचना बोरेले हया प्रख्यात व्हिसल ब्लोअर आणि जिंदल पुरस्कार विजेते रजनीकांत बोरेले यांची आई आहे हे विशेष दत्त चौक येथील जगदंबा निवस्थानला आमदार राजू तोडसम आणि नवनिर्वाचीत नगराध्यक्ष अतीष बोरेले यांच्या आशीर्वाद सत्कारच्या वेळी काका राजू बोरेले,लक्ष्मीकांत बोरेले, चंद्रकांत बोरेले, सौ.खुशी आतिष बोरेले, शिवम बोरेले, बंटी बोरेले, विशाल बोरेले, शुभम केलापुरे,स्मित झाजरी विक्रांत पवन महाराज शर्मा,गणेश कस्तूरवार, तारकेश्वर चव्हाण,अमोल राउत,विक्रांत बोरेले,सक्षम मिसाल यांच्या सह अनेकांची उपस्थिती प्रमुख्याने होती.

# वाकद येथील शेळ्या चोरी प्रकरणातील दोघे जेरबंद

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी :** निफाड तालुक्यातील वाकद (देवगाव फाटा) शिवारातून शेळयांची चोरी करणाऱ्या कोपरगाव तालुक्यातील दोन गुन्हेगारांना लासलगाव पोलिसांनी शिरवाडे ग्राम सुरक्षा दलाच्या सहकार्याने जेरबंद केले आहे. या प्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात दिनांक ८ ऑगस्ट २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, द्रोपदाबाई बाजीराव शिंदे (रा. देवगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दिनांक ४ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री सुमारे १ वाजेच्या सुमारास त्यांच्या पत्र्याच्या शेडमधून आरोपी बाळकृष्ण गंगाधर कुराडे (वय ४६) व कृष्णा पेव्हल माळी (वय ३५), दोघेही रा. धामोरी, ता. कोपरगाव, यांनी फिर्यादीच्या संमतीशिवाय लबाडीच्या उद्देशाने ३० हजार रुपये किमतीच्या सहा शेळ्या चोरून नेल्या होत्या. यामध्ये काळ्या, तांबड्या व सफेद रंगाच्या काठेवाडी जातीच्या शेळ्यांचा समावेश होता.

घटनेनंतर तपास सुरू असताना लासलगाव पोलिसांनी दिनांक २४ व २५ डिसेंबर २०२५ रोजी दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता त्यांनी शेळ्यांची चोरी



केल्याची कबुली दिली. आरोपी बाळु गंगाधर कुऱ्हाडे याच्याकडून चोरीसाठी वापरलेली १५ हजार रुपये किमतीची काळ्या रंगाची विना नंबरची कावासाकी मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे.

या यशस्वी कारवाईत शिरवाडे ग्राम सुरक्षा दलाच्या सदस्यांनी लासलगाव पोलिसांना मोलाचे सहकार्य केले. लासलगाव पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अंमलदार पोहेकॉ. ए. एन. मुरडनर यांनी तपासाची जबाबदारी पार पाडली.

या मोहिमेत शिरवाडे ग्राम सुरक्षा दलाचे सदस्य दीपक चिताळकर, श्रीकांत चिताळकर, गणेश चिताळकर, नितीन शिंदे, विशाल पवार व संभाजी चिताळकर यांनी पोलिसांना विशेष मदत केली.

# उदगीरमध्ये भटक्या कुत्र्यांची दहशत; डिसेंबरमध्ये ५५ नागरिकांवर हल्ले

**दैनिक युवक आधार**

**उदगीर (बालाजी तेलंगे) :** उदगीर शहरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. गुरुवारी एका कुत्र्याने चार जणांचा चावा घेतल्याची घटना घडली. विशेष म्हणजे १ डिसेंबर ते २५ डिसेंबर या अवघ्या २५ दिवसांत तब्बल ५५ नागरिकांना कुत्र्यांनी चावा घेतल्याची नोंद आरोग्य विभागाकडे झाली आहे. शाळकरी लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना घराबाहेर पडणेही कठीण झाले आहे.

उदगीर शहरातील चौबारा रोड, किल्ले गल्ली, सराफ लाईन, मुसा नगर आदी भागांमध्ये भटक्या कुत्र्यांची मोठी दहशत निर्माण झाली आहे. सकाळी शाळेत जाणारी लहान मुले, कामावर निघालेले कर्मचारी तसेच सायंकाळी फिरायला जाणारे ज्येष्ठ नागरिक यांना कुत्र्यांच्या हल्ल्यांचा सामना करावा लागत आहे. अनेक ठिकाणी कुत्र्यांचे कळप रस्त्यावर बसल्याने दुचाकीस्वार व पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.गेल्या काही दिवसांत कुत्र्यांच्या चाव्यामुळे जखमी झालेल्या नागरिकांना शासकीय रुग्णालयात उपचारासाठी धाव घ्यावी लागत आहे. रेबीजच्या भीतीमुळे



नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली आहे. लसीकरणासाठी होणारी गर्दी आणि औषधांची उपलब्धता यावरही ताण वाढला आहे. उदगीर नगरपरिषद प्रशासनाने भटक्या कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

कुत्र्यांचे निर्बीजिकरण, लसीकरण आणि त्यांना पकडण्याची मोहीम तातडीने राबवावी, तसेच कचरा व्यवस्थापनावर लक्ष देऊन कुत्र्यांना खाद्य मिळणार नाही याची काळजी घ्यावी, असे मत सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केले आहे. दरम्यान, वाढत्या घटनांमुळे उदगीर शहरातील नागरिक संतप्त झाले असून, प्रशासनाने वेळीच पावले उचलली नाहीत तर आंदोलनाचा इशाराही काही नागरिकांनी दिला आहे. भटक्या कुत्र्यांच्या दहशतीतून उदगीरकरांना मुक्त करण्यासाठी तातडीच्या आणि प्रभावी कारवाईची गरज निर्माण झाली आहे.

# आ. सुरेश धस या कॉम्प्युटर अभ्यासु विकास कामांची जाण असणाऱ्या नेतृत्वापुढे अधिकारी सुद्धा झाले थक्क

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा तालुक्यातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आमदार सुरेश धस यांनी मंगळवारी अधिकाऱ्यांची पाटोदा तहसिल कार्यालयात मॅरेथॉन बैठक घेतली या बैठकीत आ.सुरेश धस यांनी विचारलेल्या प्रश्नांमुळे अधिकारीच निरुत्तर झालेच मात्र आ.धस यांचे कॉम्प्युटर माईंड आणि कार्यक्षमता, नागरीकांच्या प्रश्नांची जाण असणारऱ्या आणि प्रश्न सोडविण्याची कार्यपध्दती पाहून या बैठकीतील अधिकारी व कर्मचारीच थक्क झाले. आ.सुरेश धस यांच्या अभ्यासपूर्ण प्रश्नांच्या सरबत्तीने अधिकारी व कर्मचारी पुर्ण पणे भांबावलेले दिसले. पाटोदा तालुक्यातील नागरिकांच्या प्रश्नांवर आता कुठलाही हलगर्जीपणा चालणार नाही असा ठाम इशारा देत आ.धस यांनी आढावा बैठकीत



प्रशासनाला अक्षरशः धारेवर धरले. प्रत्येक विभागाच्या कामकाजाचा सखोल अभ्यास करून आकडेवारीनिशी प्रश्नांची सरबत्ती केल्याने अधिकाऱ्यांची उत्तरे देताना नाकी नऊ आल्याचे चित्र पाहायला मिळाले. या बैठकीत महसूल, महावितरण, पंचायत समिती, शिक्षण विभाग, सार्वजनिक बांधकाम, कृषी विभाग सह आदी विभागांचा संक्षिप्त पण ठोस आढावा घेण्यात आला. तहसील कार्यालयात वाढत असलेल्या एजंटगिरीवर आमदार सुरेश धस यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत नागरिकांची फसवणूक करणाऱ्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करून कारवाईचे करण्याचे आदेश दिले. शासकीय पोर्टल्स व केवायसी च्या नावाखाली कामे अडवणाऱ्यांना खडसावण्यात आले. पाटोदा शहरातील रोडरोमिओ आणि सायलेन्सर बुलेट मुळे नागरिक त्रस्त असल्याचा मुद्दा उपस्थित करत आमदार धस यांनी पोलीस अधिकाऱ्यांना कडक सूचना दिल्या सायलेन्सर लावलेल्या बुलेट वापरणाऱ्या तरुणांवर दिसेल त्या ठिकाणी कारवाई करा गाड्या थेट पोलीस ठाण्यात आणा आणि बेकायदेशीर सायलेन्सर काढून त्या वर रोलर फिरवा शहरात दहशत माजवणाऱ्यांना धडा शिकवा असे स्पष्ट आदेश त्यांनी दिले. एकूणच मागील दहा वर्षांत झालेल्या आढावा बैठकींपेक्षा ही बैठक अधिक आक्रमक, अभ्यासपूर्ण आणि निर्णयक्षम ठरली. प्रशासनावर आमदार सुरेश धस यांची ठाम पकड या बैठकीत स्पष्टपणे दिसून आली असून,"काम करा अन्यथा कारवाईला सामोरे जा," हा स्पष्ट संदेश या वादळी बैठकीतून देण्यात आला.

# अपार आयडी - स्वयंसिद्धाचे शिक्षकांना प्रशिक्षण

## गोंदिया येथील एन.एम.डी. महाविद्यालयात विद्यापीठाचा संवाद कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने गोंदिया येथील एन.एम. डी. महाविद्यालयात संवाद कार्यक्रम बुधवार, दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी पार पडला. अपार-आयडी तसेच स्वयंसिद्धा उपक्रमाचे प्रशिक्षण गोंदिया जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य व शिक्षकांना या संवाद कार्यक्रमाच्या माध्यमातून देण्यात आले.

कार्यक्रमाला माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या कार्यस्थळी लैंगिक शोषण आणि लिंगभेद अत्याचार विरोधी संरक्षण



समिती अध्यक्ष डॉ. शालिनी लिहितकर, आयटी सेल संचालक डॉ. श्वेता बारहाते, एन.एम.डी. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविंद्र मोहतुरे, आयटी सेल समन्वयक श्री सतीश शेंडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

या शैक्षणिक संवाद कार्यक्रमात शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या स्वयंसिद्धा उपक्रमाची माहिती डॉ. शालिनी लिहितकर यांनी दिली. संस्थात्मक पातळीवर स्वयंसिद्धा उपक्रमाला अधिक बळकट करण्याचे आवाहन डॉ. लिहितकर यांनी यावेळी केले. प्रत्येक महाविद्यालयाने स्वयंसिद्धा उपक्रम अंतर्गत 'स्त्री शक्ती पोर्टल'वर नोंदणी करणे बंधनकारक असल्याचे त्यांनी सांगितले. 'स्त्री शक्ती पोर्टल'वर नोंदणी कशी करावी तसेच महिलांच्या सशक्तीकरणासाठी या पोर्टलच्या सर्व सुविधांचा प्रभावी लाभ घेण्यासाठी महिलांची १०० टक्के नोंदणी सुनिश्चित करण्याचे आवाहन त्यांनी केले.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार प्रत्येक विद्यार्थ्यांची डिजिटल शैक्षणिक ओळख निर्माण करणे आवश्यक आहे. याकरिता प्रत्येक विद्यार्थ्यांचे अपार आयडी (Apaar ID) काढणे आवश्यक असल्याची माहिती आयटी संचालक डॉ. श्वेता बाराहाते यांनी यावेळी दिली. विद्यार्थ्यांचे सशक्तीकरण, समावेशकता व डिजिटल तयारी याबाबत त्यांनी माहिती दिली. आयटी सेलचे समन्वयक श्री. सतीश शेंडे यांनी अपार आयडी त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांची नोंदणी याविषयी विस्तृत माहिती सादर केली. त्यांच्या सातत्यपूर्ण सहकार्यामुळे संस्थात्मक पातळीवर डिजिटल सुधारणा प्रभावीपणे राबविण्यास मोलाची मदत होत असल्याचे नमूद करण्यात आले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एन.एम.डी. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविंद्र मोहतुरे तसेच स्वयंसिद्धा समन्वयक डॉ. घोषाल, डॉ. बारकी यांचे आणि गोंदिया जिल्ह्यातील विविध महाविद्यलयांतील सहभागी प्राचार्य व प्राध्यापकांचे विचारपूर्ण सहभाग व मौल्यवान योगदानाबद्दल विशेष आभार व्यक्त करण्यात आले. अशा प्रकारचे शैक्षणिक संवाद संस्थांमधील सहकार्य अधिक दृढ करत असून, विद्यार्थी केंद्रित उच्च शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे. या कार्यक्रमासाठी वेळ देऊन सहभाग नोंदविणाऱ्या सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त करीत कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# 'ज्याचं मीठ, अन्न खाल्लं, त्याला सोडलं नाही' कुत्र्याचा NGO व्हिडिओने लाखांना जागृत!

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या हृदयद्रावक व्हिडिओने लाखो लोकांच्या डोळ्यात अश्रू आणले आणि विचार बदलले. मालकाने पाळलेल्या कुत्र्याला चांगल्या भविष्यासाठी NGO मध्ये सोडण्याचं ठरवलं. पण तो वफादार प्राणी सोडतानाच दारात बसून मालकाच्या पायाला चिकटला, रडू लागला. भुकेपोटी कमकुवत होऊनही डोळ्यातली ती आस पाहता प्रत्यक्षदर्शी भावूक झाले. हा प्राणी म्हणजे जिवंत उदाहरण – 'ज्याचं




मीठ खाल्लं, त्याला सोडलं नाही!'सोशल मीडियावर धुमाकूळव्हिडिओ व्हायरल होताच कमेंट्सचा पाऊस पडला. कुत्राप्रेमींनी लिहिलं, "NGO मध्ये सोडण्यापेक्षा आम्हीच पाळू, घेऊ!" एका युजरने म्हटलं, "कलियुगात प्राण्यांकडूनच वफादारी शिकावी लागेल." दुसऱ्याने भावूक होऊन लिहिलं, "हा कुत्रा खाल्लेल्या मिठाला जागला – आम्हा माणसांना लाज वाटते!" लाखो व्ह्यूज, शेअर्स झाले.प्रत्यक्षदर्शींची भावना प्रत्यक्षदर्शी समीर उर्फ नान्या आठवले सांगतात, "मालकाने 'NGO मध्ये सुखी राहील' म्हणून सोडलं, पण कुत्रा दारातच बसला. त्याच्या रडण्याने आम्हा सर्वांचे हृदय पिळेदार झालं. हा प्राणी खाल्लेल्या मिठाला जागला!""खाल्लेल मिठ" चा खरा धडाखाल्लेला मिठाला जागला ही म्हण – ज्याचं अन्न खाल्लं, त्याचे उपकार विसरून जाता कामा नये. आज कलियुगात माणूस स्वार्थी झाला – नाती गोती तुटतात, मैत्री विकत येते. पण प्राणी नेहमी एकनिष्ठ!तज्ज्ञांचं मत प्राणी तज्ज्ञ डॉ. शीतल जोशी म्हणतात, "प्राण्यांमध्ये स्वार्थ नसतो, फक्त निस्पृह प्रेम असतं."

समाजशास्त्रज्ञ प्रा. रमेश देशमुख सांगतात, "हा व्हिडिओ जागृतीचं साधन ठरेल."हा धडा आई-वडिलांसाठी, जोडप्यासाठी – 'ज्याचं मीठ खाल्लं, त्याला सोडू नका!'

# पनवेल प्रभाग क्र.१४ मधून अल्पसंख्याक समाजाचे आधारवड इकबाल काझी निवडणूक रिंगणात

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर :** पनवेल महानगरपालिका प्रभाग क्र. १४ मधील सर्वसामान्य जनतेचा आधारवड समजले जाणारे इकबाल शेठ काझी निवडणूकीच्या रिंगणात उतरत असल्याने प्रभागातील जनतेत नवचैतन्य निर्माण होताना दिसत आहे .यशस्वी उद्योजक ते भाजपचे प्रभावी मुस्लिम अल्पसंख्याक नेतृत्व म्हणून "सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास" या संकल्पनेला कृतीत उतरवणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांना ओळखले जातात .

लोकनेते रामशेठ ठाकूर यांना आपले आदर्श समजत




आमदार प्रशांत ठाकूर व आमदार विक्रांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ते वर्ष भर विविध लोकउपयोगी उपक्रमातुंन सामाजिक, शैक्षणिक आणि अध्यात्मिक क्षेत्रात निस्वार्थी भावनेतून जनसेवेच्या माध्यमातून सर्व समाजाशी नाळ जोडणारे नेतृत्व म्हणून लोकप्रिय आहेत.हिंदू–मुस्लिम ऐक्य, सर्व समाजांचा सन्मान, गरीबगरजूंच्या पाठीशी ठाम उभे राहणारे भाजप अल्पसंख्याक समाजाचे नेते इकबाल भाई हे एक विश्वासाचं नाव असून प्रभाग १४ मधून त्यांची उमेदवारी जवळ जवळ निश्चित झाली असल्याची चर्चा प्रभागात जोर धरत आहे .पक्ष ,समाज निष्ठा पाळून एकता, विकास आणि विश्वास ठेवणारे समाजसेवक इकबाल काझी यांच्या रूपाने एक नवं पर्व घेऊन भाजप त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करणार असल्याने पनवेल महापालिकेत इकबाल शेठ काझी हे पुढील काळात प्रभाग १४ मधून अल्पसंख्याक समाजाचे नेतृत्व करताना दिसतील असा ठाम विश्वास त्यांच्या समर्थकांच्या वतीने व्यक्त केला जात आहे.

# अटलजींच्या त्यागाने आणि विचारांनीच भाजपची महान वास्तू उभी – केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राहुल मडावी/ नागपूर :** भारताचे माजी पंतप्रधान, भारतरत्न श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टी, नागपूर महानगरच्या वतीने आज श्रद्धानंदपेठ येथील बी.आर.ए. मुंडले सभागृह (अंध विद्यालय) येथे 'अटल संवाद सभा' उत्साहात पार पडली.या विशेष सभेचे मुख्य वक्ते म्हणून केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना.नितीनजी गडकरी उपस्थित होते.त्यांनी आपल्या ओघवत्या शैलीत अटलजींच्या आठवणींना उजाळा देत



कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.नितीन गडकरी यांनी अटलजींच्या जीवनातील अनेक प्रेरक प्रसंग सांगितले. ते म्हणाले की, "एकदा अटलजी नागपुरात आले असता कार्यकर्त्यांनी "देश का नेता कैसा हो अटलजी जैसा हो" च्या घोषणा दिल्या. तेव्हा अटलजींनी कार्यकर्त्यांना थांबवून मार्गदर्शन केले की, केवळ नेत्याच्या नावाने घोषणा देण्यापेक्षा 'हमारा देश कैसा हो' यावर विचार आणि तशा घोषणा द्यायला हव्या."अटलजींनी कार्यकर्त्यांसमोर नेहमी'राष्ट्र प्रथम,नंतर पार्टी आणि शेवटी स्वतः' हा आदर्श ठेवला.आज भाजप पक्ष जो विशाल वटवृक्ष झाला आहे,त्यामागे अनेक पिढ्यांचे बलिदान,तपश्चर्या आणि समर्पण आहे. या संघर्षात अटलजी हे सर्वांचे प्रेरणास्थान होते,असेही गडकरींनी नमूद केले.भाजपा नागपूर महानगरचे अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली, त्यांनी अटलजींच्या जन्मशताब्दी वर्षाचे महत्त्व आणि या संवाद सभेमागची भूमिका स्पष्ट केली.याप्रसंगी मंचावर आमदार मोहन मते,आमदार प्रवीण दटके माजी आमदार विकास कुंभारे,माजी आमदार अनिल सोले, गिरीश व्यास, बंटी कुकडे,महामंत्री श्रीकांत आगलावे,संदीप जाधव,रितेश गावंडे,मनीषा धावडे,संपर्क मंत्री विष्णू चांगदे,सह संपर्क मंत्री बाल्या बोरकर, महिला मोर्चा अध्यक्ष दिव्याताई धुरडे उपस्थित होते. या सभेला नागपूर महानगरातून २,००० पेक्षा जास्त कार्यकर्ते उपस्थित होते. संपूर्ण परिसर अटलजींच्या अजरामर कवितांच्या बॅनर्सनी व्यापलेला होता,ज्यामुळे उपस्थितांमध्ये चैतन्याचे वातावरण होते.

# बालमोहन शाळेतील स्वराली पाटील हिची राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड

**दैनिक युवक आधार**
**मुंबई(शांताराम गुडेकर) :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद अकोला व जिल्हा क्रीडा अधिकारी द्वारा आयोजित राज्यस्तर शालेय बेसबॉल क्रीडा स्पर्धा 2025-26 स्पर्धा नुकतीच संपन्न झाली. दिल्लीत पुढे ही स्पर्धा राष्ट्रीय स्तरावर खेळवण्यात येणार असून बालमोहन विद्यालयची विद्यार्थी स्वराली संतोष पाटील हिची राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड करण्यात आली



आहे.महाराष्ट्राच्या कोल्हापुर जिल्हातील गगनबावडा तालुक्याचे व मुंबईचे सामाजिक कार्यकर्ते, हॉटेल व्यवसाय उद्योजक संतोष पाटील यांची कन्या स्वराली संतोष पाटील हिची 69 व्या राज्यस्तर शालेय बेसबॉल क्रीडा स्पर्धा अंडर 14 साठी महाराष्ट्र संघासाठी मुंबई मधून निवड करण्यात आली आहे. ह्या स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या जिल्हातुन एक खेळाडू अश्या प्रकारे निवड करण्यात आली आहे. ज्या मध्ये महाराष्ट्र संघाची सदस्य म्हणून स्वराली पाटील हीची निवड मुंबई जिल्हातून करण्यात आली आहे. सदर स्पर्धा दिनांक 10 ते 15 जानेवारी 2026 दरम्यान दिल्ली येथे खेळवली जाणार आहे.

स्वराली पाटील हीच्या या निवडीबद्दल सर्वस्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

# ६जानेवारी,या पत्रकार दिनाच्या पूर्वसंध्येला जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या पुतळ्याला अभिवादन

**दैनिक युवक आधार**
**पोंभुर्ले प्रतिनिधी/ गुरुनाथ तिरपणकर :** दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची६जानेवारी रोजी जयंती आहे.या दिवशी पत्रकार संघटना त्यांची जयंती उत्साहात साजरी करतात.त्याच अनुषंगाने जनजागृती सेवा संस्था गेली चार वर्षे विविध शहरातील पत्रकारांचा सत्कार करत असते.यावेळीही कोकणात पत्रकारांचा सत्कार होणार आहे.त्याअगोदर६जानेवारी या पत्रकार दिनाचे औचित्य साधून जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने पोंभुर्ले,ता. देवगड, जिल्हा.सिंधुदुर्ग येथील आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मारकाला भेट दिली.पोंभुर्ले हे त्यांचे मूळ जन्म गाव.याप्रसंगी जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.संस्थेचे पत्रकारितेतील सन्मानपत्र व संस्थेचा पंचवार्षिक अहवाल त्यांच्या चरणी नतमस्तक



होऊन समर्पित करण्यात आला.याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून खारेपाटण ज्युनिअर कॉलेजचे प्रा.सुबोध देसाई, कणकवली एस.टी.विभागीय कार्यालयाचे सेवा निवृत्त वाहतूक निरिक्षक प्रकाश साखरे उपस्थित होते.या प्रमुख पाहुण्यांचा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व आभार पत्र देऊन सत्कार करण्यात आला.तसेच सभागृहातील फोटो, माहिती जाणून घेतली. या कार्यक्रमासाठी ज्युनिअर कॉलेज खारेपाटणचे प्राचार्य श्री.संजय सानप, खारेपाटण पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रविण शेठ लोकरे, ज्युनिअर कॉलेज खारेपाटणचे प्रा.अजय गुरसाळे यांचे विशेष सहकार्य लाभले.

# पुरस्कारासाठी कथासंग्रह पाठवण्याचे लेखकांना आवाहन

**दैनिक युवक आधार**
**सातारा / प्रतिनिधी :** संबोधी प्रतिष्ठानच्या वतीने या वर्षापासून दिवंगत प्रसिद्ध साहित्यिक कथाकार सुधाकर यशवंत उर्फ सु. य. बोरगावकर यांच्या स्मरणार्थ नवोदित लेखकाच्या प्रथम प्रकाशित कथा संग्रहासाठी राज्यस्तरीय पुरस्कार योजना सुरू करण्यात येत आहे. त्यासाठी २०२५ साला मध्ये प्रकाशित झालेले कथासंग्रह पाठवावेत असे आवाहन, संबोधी प्रतिष्ठानचे अध्यक्ष रमेश इंजे व निमंत्रक,संयोजक दिनकर झिंब्रे यांनी केले आहे. कथाकार सुधाकर यशवंत बोरगावकर यांचे वयाच्या ९० व्या वर्षी सातारा येथे निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ नवोदित लेखकांना प्रोत्साहन देण्याचे हेतूने राज्यस्तरीय कथासंग्रह पुरस्कार योजना सुरू करण्यात आली आहे. कथाकार सु. य.बोरगावकर हे ख्यातनाम साहित्यिक कथाकार वामन होवाळ तसेच प्रसिद्ध साहित्यिक सरोजिनी बाबर यांचे अत्यंत जवळचे स्नेही होते. त्यांचे हुरडा व हिसका हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. तसेच त्यांच्याअनेक कथा, कविता प्रबुद्ध भारत नियतकालिक तसेच विविध मासिके व दैनिकांमध्ये प्रकाशित झाल्या आहेत. त्यांच्या नावाने देण्यात येणाऱ्या संबोधी प्रतिष्ठानच्या या पुरस्कारासाठी नवोदित लेखकाचा १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत प्रसिद्ध होणारा पहिला कथासंग्रह विचारात घेतला जाईल . त्यासाठी लेखक अथवा प्रकाशकांनी आपल्या साहित्य कृतीच्या दोन प्रती १५ जानेवारी २०२६ पर्यंत खालील पत्त्यावर पाठवणे आवश्यक आहे.

या पुरस्काराचे स्वरुप दहा हजार रुपये धनादेश, सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ असे आहे. पुरस्काराचे वितरण मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते कथाकार सुधाकर यांच्या स्मृतिदिनी विशेष समारंभात केले जाईल. जाणकार परीक्षकांच्या निवड समितीकडून सर्वोत्कृष्ट कथासंग्रहाची निवड केली जाईल. तरी या पुरस्कारासाठी लेखकांनी आपले कथासंग्रह खालील पत्त्यावर पाठवावेत असे आवाहन संबोधी प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष प्रा. प्रशांत साळवे यांनी केले. कथा संग्रह पाठवण्यासाठी पत्ता : निमंत्रक, संयोजक, दिनकर झिंब्रे, मोबाईल नंबर 9881599991C/o हर्ष ॲडव्हरटायझर्स, छत्रपती शाहू स्टेडियम शॉप नंबर तीन, शक्ती स्पोर्ट्स जवळ, सातारा-415001

# पुण्याचे माजी महापौर व राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांचा काँग्रेस पक्षात प्रवेश

## लोक उगवत्या सुर्याला नमस्कार करतात पण जगताप यांनी वैचारिक लढ्यासाठी काँग्रेस पक्षात प्रवेश केला: हर्षवर्धन सपकाळ

## प्रशांत जगताप विचारांशी तडजोड न करणारे, अनेक पक्षांची ऑफर धुडकावून विचारासाठी काँग्रेसचा मार्ग पत्करला : विजय वडेट्टीवार

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** पुण्याचे माजी महापौर व राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी आज महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी त्यांच्यासोबत पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अनेक पदाधिकाऱ्यानीही काँग्रेस पक्षात प्रवेश केला. प्रशांत जगताप यांना अनेक पक्षांचे आमंत्रण असतानाही त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश करणे पसंद केले. महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रशांत जगताप यांचा काँग्रेस पक्षात प्रवेश हा काँग्रेसला बळ देणारा आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जगताप व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे काँग्रेस पक्षात स्वागत केले.

काँग्रेस पक्षाचे मुख्यालय टिळक भवनमध्ये झालेल्या कार्यक्रमाला प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस कार्य समितीचे सदस्य व माजी मंत्री नसीम खान, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव बी. एम. संदीप, आमदार हेमंत ओगले, प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष मोहन जोशी, युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे सरचिटणीस भाऊसाहबे आजबे, धनंजय शिंदे, आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, शिव, शाहू, फुले, आंबेडकरांची विचारधारा व काँग्रेस पक्ष या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. राजकीय पक्ष हे विचारधारेवर काम करत असतात आणि काँग्रेस पक्ष ही वैचारिक लढाई निष्ठेने व निकराने लढत आहे. पण आज काही पक्ष हे केवळ सत्ता व सत्तेतून भ्रष्ट मार्गाने पैसा मिळवणे व त्या पैशातून निवडणुका जिंकणे हे काम करत आहेत. पैसा फेक व तमाशा देख हे वगनाट्य जोरात सुरु आहे. काँग्रेसची विचारधारा देशाला तारणारी आहे आणि प्रशांत जगताप यांनी आज काँग्रेसच्या प्रशांत महासागरात प्रवेश केला आहे, त्यांचे काँग्रेस पक्षात स्वागत आहे.

काँग्रेस पक्षाला विचारांचा वारसा आहे, समता, बंधुता, सामाजिक न्याय या मुल्यांसाठी काँग्रेसचा लढा आहे. तर दुसरीकडे जातीवादी मनुवादी विचाराचा भाजपा पक्ष आहे. भाजपाची भूमिका ही केवळ मूठभर लोकांच्या हाती राजसत्ता व धर्मसत्ता असावी अशी आहे. काही लोकांना



काँग्रेस पक्षाने मुख्यमंत्री, मंत्री आमदार खासदार सर्व पदे दिली पण त्यांची घुसमट होते म्हणून ते काँग्रेस पक्ष सोडून गेले. लोक उगवत्या सुर्याला नमस्कार करतात पण जगताप आणि वैचारिक लढ्यासाठी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.

विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यावेळी म्हणाले की, प्रशांत जगताप हे राष्ट्रावादी काँग्रेस पक्ष (शरद पवार) यांच्या बरोबर काम करत होते. प्रशांत जगताप यांनी जातीयवादी पक्षाबरोबर जाणार नाही ठाम भूमिका घेतली व काँग्रेस पक्षात प्रवेश केला, विचारांशी बांधिलकी अशी असली पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले, आंबेडकर विचारांशी तोडजोड न करणारे ते नेते आहेत. त्यांना अनेकांनी ऑफर दिली, थांबावण्याचा प्रयत्न केला पण प्रशांत जगताप यांनी पुरोगामी शाहू, फुले, आंबेडकरांचा विचार सोडला नाही असे नेते असतील तर २०२९ आपले असेल, असा विश्वास वडट्टेवार यांनी व्यक्त केला.

माजी मंत्री नसीम खान म्हणाले की, आज देशासमोर लोकशाही, संविधान वाचवण्याची नितांत गरज आहे. शेतकरी, महिला, बरोजगारांचे प्रश्न आहेत, कायदा सुव्यवस्थेचे प्रश्न आहेत, पण कोणालाही न्याय मिळत नाही. या ज्वलंत प्रश्नावर काँग्रेस पक्ष लढा देत आहे. राज्यात व देशात जातीयवाद व भ्रष्टाचार वाढत चालला आहे. भाजपाने खोटे बोलून जनतेची दिशाभूल केली. तोडा फोडा ही भाजपाची निती आहे, अशा वेळी देशाला केवळ काँग्रेस विचारच वाचवू शकतो.

प्रशांत जगताप यावेळी म्हणाले की, काँग्रेस पक्ष आहे १३५ वर्षांचा जुना पक्ष असून अथांग महासागर आहे कितीही वादळे आली तरी काँग्रेस पक्ष हिमालयासारखा खंबीरपणे उभा आहे. पुरोगामी विचाराचा मी कार्यकर्ता असून शिव शाहू फुले आंबेडकर, गांधी व नेहरु विचार पुढे घेऊन जाण्यासाठी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. माझी लढाई जातीवादी व भ्रष्टाचाराविरोधात आहे. आणि आज भाजपाला फक्त काँग्रेस पक्षच टक्कर देऊ शकतो असे जगताप म्हणाले..

**काँग्रेसच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षांचा सत्कार**

नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकीत काँग्रेस पक्षाने ४१ नगराध्यक्ष विजयी झाले. या विजयी नगराध्यक्षांचा आज टिळक भवनमध्ये काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार व प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत जाहीर सत्कार करण्यात आला.

नगरपालिका निवडणुकीत १००६ नगरसेवक निवडून आले तर १०० नगरपालिकांमध्ये काँग्रेस पक्ष दुसऱ्या क्रमांकावर आहे.या निवडणुकीत सत्ताधारी पक्षांनी पैशांचा वारेमाप वापर केला, पोलीसांचा वापर केला. निवडणूक आयोग त्यांच्या मदतीला होता. काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांना दमबाजी करण्यात आली, मारहाण करण्यात आली, खोटे गुन्हे दाखल करण्यात आले तरीही काँग्रेसचा कार्यकर्ता न डगमगता लढला व यश मिळवले, आज राज्यात काँग्रेस प्रमुख विरोधी पक्ष बनला आहे. ४१ ही संख्या फार मोठी नाही पण आजच्या विपरीत परिस्थितीत जे यश मिळवले आहे ते उल्लेखनीय आहे. जे विजयी झाले त्यांचे अभिनंदन आहेच पण जे पराभूत झाले त्यांचेही अभिनंदन आहे कारण त्यांना निर्धाराने लढा दिला असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

आगामी महापालिका निवडणुकीसाठी ‘काँग्रेस लढणार, महाराष्ट्र जिंकणार’, या टॅगलाईनचे व टिझरचे प्रकाशन करण्यात आले.

# रेवदंडा बीचवर नाताळ-नववर्षाच्या उत्सवाची धुम!

## कोकणातील निसर्गरम्य किनारपट्टी पर्यटकांनी फुलली

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** रेवदंडा हिरवीगार नारळी पोफळींच्या झाडांनी पांघरलेल्या शालेवरून डोळ्यांना सुखावणारा अथांग समुद्र, त्याच्या मध्यभागी डोलणारा कोलई किल्ला आणि बाजूला भव्य रेवदंडा-आगरकोट किल्ले – कोकण म्हटलं की असंच निसर्गसौंदर्याचं अनमोल खजिनाच! याच निसर्गरम्य वातावरणाचा आस्वाद घेण्यासाठी आणि नाताळ-नववर्षाच्या सुट्ट्यांचा खराखुरा आनंद घेण्यासाठी रायगड जिल्ह्यातील किनारपट्ट्यांकडे पर्यटकांची लाट उसळली आहे. विशेषत: रेवदंडा बीचवर प्रचंड गर्दी उसळली असून, हा किनारा सध्या पर्यटकांच्या हशा-हुलस्सांनी आणि उत्सवमय वातावरणाने नटला आहे. नाताळानिमित्त राज्यभरातून हजारो पर्यटक कोकणात दाखल झाले आहेत. अलिबाग, मुरुड, नागाव, श्रीवर्धन आणि विशेषत: रेवदंडा या समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची मोठी गर्दी उसळली आहे. रेवदंडा बीचवर समुद्रकिनारी फेरफटका मारताना कोलई किल्ल्याकडे डोळे लावलेले पर्यटक, जलक्रीडा, कॅम्पफायर, हॉलीबॉल- क्रिकेटसारख्या खेळांचा



आनंद घेताना दिसत आहेत. संगीत मैफलींमधील गाण्यांच्या ठेक्यांवर नाचणारे तरुण, समुद्राच्या लाटांमध्ये भिजताना हसणारे कुटुंबे – हा अनुभव प्रत्येकाच्या मनात कायमचा घर करून जाणार असा आहे. "रेवदंडाच्या या निसर्गसौंदर्याने आम्हाला शहराच्या धावपळीपासून सुटका मिळाली. किल्ले आणि समुद्र एकत्र असा अद्भुत संगम कुठे दिसेल?" असं मत मुंबईहून आलेल्या पर्यटक स्मितांच्या सांगितलं. जिल्ह्यातील रेवदंडा, नागाव, काशिद येथील बहुतांश रिसॉर्ट्स, फार्महाऊसे आणि होमस्टे पंधरा दिवस आधीच बुकिंगमुळे हाऊसफुल झाले आहेत. यामुळे व्यावसायिकांमध्ये समाधानाची लहर उसळली आहे. तसेच, पापलेट, सुरमई, बांगडा, कोलंबी, शिंपल्या, खेकडे, पोपटीसारख्या कोकणातील खास मासे आणि सीफूड खवय्यांना खूप आवडत असल्याने कोळीबांधवांचा धंदाही जोरात आहे. रेवदंडा बीचवर सकाळीच मासे विकणाऱ्या कोळी महिलांच्या टपऱ्यांवर पर्यटकांची रांगा लागल्या आहेत. "नाताळी सणाला सीफूडचा आस्वाद घ्यायचा म्हणून इथे आलो. हा खरा कोकणाचा फॅमिली पॅकेज!" असं नागपूरहून आलेल्या कुटुंबाने सांगितलं.पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे जिल्हा प्रशासन आणि पोलिस यंत्रणा सतर्क झाल्या आहेत.

रेवदंडा, नागावसह इतर किनारपट्ट्यांवर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी विशेष व्यवस्था, सुरक्षा आणि स्वच्छतेवर लक्ष केंद्रित केलं आहे. समुद्रात सतर्कतेसाठी लाईफगार्ड्सची नियुक्ती, कचरा व्यवस्थापन आणि पार्किंगसाठी वेगळ्या जागा – सर्व तयारी पूर्ण झाली आहे. नाताळ आणि नववर्षाच्या स्वागतासाठी रायगड जिल्हा सज्ज झाला असून, कोकणातील पर्यटन पुन्हा एकदा वेगाने वाढत असल्याचं चित्र आहे. या उत्सवमय वातावरणात रेवदंडा बीचाने सर्वांचे मन जिंकलं असून, कोकणाची ही निसर्गमय ओढ खऱ्या अर्थाने तेजीत आली आहे.

# ओडिशाहुन आलेल्या मुलावर यशस्वीरित्या 'कॉम्प्लेक्स हॅप्लो-आइडेंटिकल ट्रान्सप्लांट' केले


**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई,प्रतिनिधी :** अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईने ओडिशाहुन आलेल्या, 'सिकल सेल बीटा थॅलेसेमिया' (एक गंभीर अनुवांशिक रक्तविकार) असलेल्या एका ४ वर्षांच्या मुलावर यशस्वीरित्या 'कॉम्प्लेक्स हॅप्लोआइडेंटिकल बोन मॅरो ट्रान्सप्लांट' (अस्थिमज्जा प्रत्यारोपण) पूर्ण केले आहे. मुलाला वारंवार रक्त चढवावे लागत होते आणि त्याला वारंवार तीव्र वेदनांचा त्रास होत होता, ज्यामुळे त्याला अनेकदा रुग्णालयात दाखल करावे लागले.

क्युरेटिव्ह उपचारांच्या शोधात हे कुटुंब अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईमध्ये आले. सिकल सेल बीटा थॅलेसेमिया हा एक अनुवांशिक रक्तविकार आहे जो एका पालकाकडून सिकल सेल जनुक (HbS) आणि दुसऱ्या पालकाकडून बीटा-थॅलेसेमिया जनुक वारशाने मिळाल्यामुळे होतो.

यामुळे शरीरात असामान्य हिमोग्लोबिन तयार होते, ज्यामुळे तीव्र ॲनिमिया (रक्तक्षय), वारंवार वेदना होणे आणि लहान वयापासूनच गंभीर आजारपण उद्भवते.

सविस्तर तपासण्या आणि मूल्यमापनानंतर, बोन मॅरो ट्रान्सप्लांट



(अस्थिमज्जा प्रत्यारोपण) हाच एकमेव क्युरेटिव्ह पर्याय असल्याचे निश्चित करण्यात आले. पूर्णपणे जुळणारा (fully matched) दाता उपलब्ध नसल्यामुळे, वैद्यकीय पथकाने अंशतःजुळणाऱ्या कौटुंबिक दात्याकडून 'हॅप्लोआइडेंटिकल स्टेम सेल ट्रान्सप्लांट' करण्याचा निर्णय घेतला, जे एप्रिल २०२५ मध्ये यशस्वीरित्या पार पडले. प्रत्यारोपणानंतरच्या काळात 'CMV रिएक्टिव्हेशन' आणि त्यानंतर उद्भवलेल्या तीव्र 'गट GVHD' मुळे गुंतागुंत निर्माण झाली, ज्यामध्ये पोटदुखी, जुलाब आणि रक्तस्त्राव अशी लक्षणे दिसून आली. सुरुवातीच्या स्टिरॉइड उपचारानंतरही प्रकृतीत सुधारणा न होता ही स्थिती 'स्टिरॉइड-रिफ्रॅक्टरी ग्रेड ४ गट GVHD' मध्ये रूपांतरित झाली, जी एक जीवघेणी गुंतागुंत असल्याने तातडीने उच्चस्तरीय उपचारांची आवश्यकता होती.

प्रगत इम्युनोसप्रेशन (रोगप्रतिकारशक्ती नियंत्रण), संसर्ग नियंत्रण, चोख देखरेख आणि अवयव आधार (organ support) यांचा समावेश करून सखोल आणि मल्टी-डिसिप्लिनरी उपचार सुरू करण्यात आले. वेळेवर मिळालेल्या उच्चस्तरीय उपचारामुळे मुलाच्या प्रकृतीत सातत्याने सुधारणा झाली आणि जुलै २०२५ मध्ये त्याला स्थिर प्रकृतीत रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. हे प्रकरण पूर्णपणे जुळणारे दाते उपलब्ध नसताना 'हॅप्लो-आइडेंटिकल ट्रान्सप्लांटेशन'चे महत्त्व अधोरेखित करते, तसेच प्रत्यारोपणानंतर उद्भवणाऱ्या गंभीर गुंतागुंतींचे वेळीच निदान आणि त्यावर ठोस व्यवस्थापन करण्याचे महत्त्व दर्शवते.

'हॅप्लो-आइडेंटिकल स्टेम सेल ट्रान्सप्लांट' उपचार अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई येथील मल्टी-डिसिप्लिनरी वैद्यकीय पथकाद्वारे करण्यात आले, ज्यामध्ये डॉ.विपिन खंडेलवाल, डॉ. पुनीत जैन, डॉ.दिपाली पाटील, डॉ.प्रज्ञा, डॉ.अमेय सोनावणे अपोलो चिल्ड्रन्स, नवी मुंबई येथील तज्ज्ञांचा समावेश होता.

केसमध्ये संपादन केलेल्या यशाने मुलांमधील गुंतागुंतीचे बोन मॅरो ट्रान्सप्लांट आणि प्रत्यारोपणानंतर उद्भवणारी उच्च जोखमीची गुंतागुंत हाताळण्यातील अपोलोचे प्रगत नैपुण्य अधोरेखित केले.

# भविष्यात वंचित विरुद्ध भाजप असे दोनच राजकीय स्तंभ शिल्लक राहतील का?

सध्या महाराष्ट्रातील राजकीय स्थितीच अशी झाली आहे की, ज्यांना आपण प्रस्थापित राजकीय पक्ष समजतो त्या सर्वच पक्षांना घरघर लागलेली असून ते व त्यांचे पक्षीय नेते भाजपचे राजकीय गुलाम झालेले आहेत. बरे हे फक्त त्या त्या पक्षाच्या राजकीय नेत्यांचेच झाले असे नाही तर, ग्राम पातळीपासून ते राज्य पातळीपर्यंत हिच स्थिती झालेली आहे. भाजपच्या विरोधात बोलायला व त्यांच्या महागाई, भ्रष्टाचार, हिंदूत्व यावर बोलण्याची व त्याविरोधात पक्षकार्यकर्त्यांना कृती कार्यक्रम देण्याची कोणातच हिम्मत राहिलेली नाही. जर कृतीकार्यक्रम पक्षनेतृत्व म्हणून आखला व त्याची अंमलबजावणी केली तर आपणही ईडी व सीबीआय यांच्या चौकशीच्या फे-यात सापडतो की काय व आपलीही रवाणगी जेलमध्ये होती की काय? अशी स्थिती सर्वच राजकीय पक्षांची व त्यांच्या पक्ष प्रमुखांची झालेली आहे. यामुळे ते या भीतीनेच घाबरलेले व गारठलेले आहेत. यामुळे प्रस्थापित पक्षप्रमुखांची आजची अवस्था हि सर्कशितल्या वाघाप्रमाणे झालेली आहे. कारण या सर्वच प्रस्थापित पक्षप्रमुखांना एकटा भाजप सर्कशितल्या रिंगमास्टर प्रमाणे चाबूक वाजवून आपल्या तालावर व हूकमावर नाचवत आहे. तसेच भाजपच्या तालावर नाचल्याशिवाय राजकीय पक्षप्रमुख व प्रस्थापित राजकीय घराणी यांच्यापुढे कोणताही पर्याय राहिलेला नाही. हे आता सर्वच भारतीय मतदार समजून चूकलेले आहेत. यामुळे आजपर्यंत महाराष्ट्रातील कोणते राजकीय घराणे भाजपच्या दावणीला गेले नाहीत व कोणते जाण्याच्या तयारीत नाहीत हे दुर्बिणीतून पाहूनही सापडणार नाही. अशी कधी नव्हे ती दयनीय व धास्तावलेली अवस्था आज प्रस्थापित पक्षप्रमुखांची व प्रस्थापित राजकीय घराण्यांची झालेली आहे याचे नेमके कारण म्हणजे या प्रस्थापित पक्ष प्रमुखांनी आपल्या महाराष्ट्रावर जवळ जवळ सहा दशके आलटून पालटून राज्य केले व सत्तेचा मलिदा चाखला. बहुजन समाजाला व मागासवर्गीय समाज नेतृत्वाला या प्रस्थापित पक्ष प्रमुखांनी आपल्या दावणीचे हक्काचे राजकीय गुलाम समजून आपली सत्तास्थाने अबाधित राखली. उलट बहुजन व मागासवर्गीय समाजाला आपली सत्तास्थाने अबाधित राखून ठेवण्यासाठी पक्षप्रमुखांचे हात बळकट करा असा फसवा कृतीकार्यक्रम राबवून, त्यालाच जाणता राजा, महाराष्ट्राचा वाली अशा मोठमोठ्या पदव्या वापरून राजकीय महर्षी, चाणक्य बनवण्याचा प्रयत्न केला व तशीच फसवणूकही केली. पण ज्यांची राजकीय महर्षी व चाणक्य म्हणून स्तुती केली त्या राजकीय चाणक्याने सुधाकर नाईकां सारख्या मुख्यमंत्री झालेल्या मागासवर्गीय माणसाला भर विधानभवनात स्वर्गीय विलासराव देशमुखां कडून चपला फेकून मारायला लावून त्यांची बेईज्जती करायला लावली. तर रामदास आठवले सारख्या दलित नेत्याला गरज संपल्यावर चालत्या गाडीतून उतरून देवून सोनियाचा वाडा दाखवला. तसेच स्व.मधुकरराव पिचड हे काँग्रेस सोडून येण्यास तयार नसताना त्यांना धमकावून व ते हॉस्पिटल मध्ये ॲडमिट असताना पद्मसिंह पाटलांना पाठवून त्यांच्या पोटाला चाकू लावून गाडीत घालून पक्षप्रमुख चाणक्या समोर उभे करण्यात आले. याचप्रमाणे भुजबळाची जिरवण्यसाठी त्यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली जेलमध्ये पाठवण्यास सांगून पुतण्यावरचे आरोप झाकण्यासाठी भुजबळांना पहिला दोषी ठरवण्यात आले. पण त्यांच्या मदतीला वंचितचे सर्वेसर्वा श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर धावूध आले व स्वतः वकीलीचा कोट चढवून त्यांची सोडवणूक केली. म्हणजेच थोडक्यात दलित, आदिवासी, एनटी व ओबीसी या मागासवर्गीय नेत्यांचे राजकीय शोषण करून त्यांच्याच जीवावर आपली सत्तेची पोळी भाजण्यात आली. पण आज हे सारेच प्रस्थापित पक्षप्रमुखांचे पक्ष फोडण्यात भाजप यशस्वी ठरली आहे. स्वतःला हिंदुहृदयसम्राट म्हणणा-यांचाही पक्ष फोडण्यात व त्यांचे धनुष्यासह सारेच चोरून आपल्या हुकमी एक्याला देण्यात भाजपने आपली यशस्वीता कधीच दाखवली आहे. तर मनकवडे पद्धतीने पक्ष चालवून धर्मनिरपेक्षतेला व प्रांतवादाला खतपाणी घालून, भारतीयांच्या ऐक्याला सुरूंग लावून, भोंगे वाजवून व हनुमान चालीसा म्हणून दाखवणा-या पक्षाला व पक्षप्रमुख विदुषकाला वेळेतच भाजपने शून्यावर आणून ठेवले. यामुळे सर्वच पक्षांनी व पक्षप्रमुखांनी भाजपची व त्यांच्या राजकीय कार्यप्रणालीची धास्ती घेतली आसून त्यांच्या देशोन्नतीच्या, धर्मोन्नतीच्या फसव्या व बाजारबुणग्या गप्पाही बंद झाल्या आहेत. यामुळे भाजप विरोधात खंबीरपणे बोलणारा व गंभीरपणे चालणारा आणि भाजपची मातृसंघटना असणाऱ्या आरएसएसलाही त्यांच्याच बालेकिल्ल्याच्या दारात रोखणारा एकच पक्ष राहिला आहे व तो म्हणजे वंचित बहुजन आघाडी नावाचा पक्ष. या पक्षाचे सर्वेसर्वा श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर नावाचा निष्कलंक, निर्मोही व तमाम कष्टकरी, शेतकरी, दलित,ओबीसी, मुस्लिम व आदिवासी यांचा तारणहार व कैवारी असा बहुजन हृदयसम्राट नेता होय. यामुळे भविष्यात भाजपसी दोन हात करणारा व त्यांच्या हिंदूराष्ट्राला, पेशवाईला व बहुजनद्रोही, मुस्लिमद्रोही व संविधानद्रोही आणि संविधानिक एकात्मतेला विरोध करणाऱ्या विचारसरणीला लगाम फक्त वंचितच घालू शकतो. बाकी एकाही पक्षात व पक्षनेतृत्वात ती हिम्मत आणि धमक उरलेली नाही. सारेच पक्ष व पक्षप्रमुख हे ब्राम्हण्यवादाचे व विषारी ह्रिदूत्वाचे पाठीराखे असून ते सारेच भाजपचे राजकीय गुलाम आहेत. यामुळे भविष्यात वंचित बहुजन आघाडी हाच एकमेव पक्ष भाजपचा विरोधक राहिल व तोच भविष्यात भाजपनतंर सत्तेच्या तख्तावर बसेल आणि तोच समाजाला एकता, बंधुता व धर्मनिरपेक्षता मार्गाने न्याय देवून, देशाची संविधानिक पद्धतीने सेवा करेल. हे राजकीय चित्र आता जवळजवळ स्पष्ट झालेले आहे व जनतेच्याही ते गळी उतरायला लागलेले आहे.

प्रकाश गवारे

## परिषदेच्या राज्यस्तरीय आदर्श जिल्हा आणि तालुका पत्रकार संघ पुरस्कारांची घोषणा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने दरवर्षी देण्यात येणारया पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ आणि वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे.. परभणी जिल्हा मराठी पत्रकार संघाला 2025 चा आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे..

बेला, चामोर्शी, नांदगाव-मनमाड, पनवेल, आंबेगाव, किनवट, संग्रामपूर, अंबाजोगाई आणि मुंबई उपनगर या तालुका संघांना आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार जाहीर करण्यात आल्याची घोषणा एस.एम. देशमुख आणि अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर यांनी केली आहे..

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने उत्कृष्ट कार्य करणारया जिल्हा आणि तालुका पत्रकार संघांना दरवर्षी पुरस्कारांनी गौरविले जाते.. आठ महसूल विभागातून प्रत्येकी एका तालुका संघाची निवड केली जाते.. यावेळी विशेष बाब म्हणून विदर्भातून दोन तालुका संघांना तसेच मुंबई उपनगरांतून एका पत्रकार संघाला सन्मानित केले जाणार आहे.. राज्यातील 36 जिल्ह्यातून एका आदर्श जिल्हा संघाची निवड केली जाते..

2025 मधील आदर्श जिल्हा पत्रकार संघाचा पुरस्कार परभणी जिल्हा पत्रकार संघालादेण्यात येत आहे..पुढील तालुका संघांना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत..

नागपूर विभाग : बेला तालुका पत्रकार संघ जिल्हा नागपूर

नागपूर विभाग : चामोर्शी तालुका पत्रकार संघ, जि. गडचिरोली

नाशिक विभाग : नांदगाव - मनमाड मराठी पत्रकार संघ जिल्हा नाशिक

कोंकण विभाग : पनवेल महानगर प्रेस क्लब जि. रायगड

पुणे विभाग : आंबेगाव तालुका पत्रकार संघ जि. पुणे

लातूर विभाग : किनवट तालुका पत्रकार संघ जि. नांदेड

संभाजीनगर विभाग : अंबाजोगाई तालुका पत्रकार संघ जि. बीड

अमरावती विभाग* : संग्रामपूर तालुका पत्रकार संघ जि. बुलढाणा

कोल्हापूर विभाग : पलूस तालुका मराठी पत्रकार संघ जि. सांगली.

मुंबई विभाग :उपनगर पत्रकार असोशिएशन,

सन्मानपत्र, मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्कारांचे स्वरूप असून दरवर्षी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात येते.. पुरस्कार वितरणाचा हा सोहळा अत्यंत दणदणीत होतो.. राज्यभरातून किमान हजार पत्रकार या सोहळ्यासाठी उपस्थित असतात..

# श्री अम्बिका योगाश्रमाचा २६वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी/प्रविणभाऊ पवार** : भिवंडी तालुक्यातील लाखीवली गावात निसर्गरम्य परिसरात वसलेल्या अम्बिका योगाश्रमाच्या प्रकल्पात "श्री अम्बिका योगाश्रमाचा २६ वा वर्धापन दिन" गुरूवार दिनांक २५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत अत्यंत भक्तीभावात आणि उत्साहात साजरा करण्यात आला.

या वर्धापन दिन सोहळ्यासाठी महाराष्ट्रभर पसरलेल्या श्री अम्बिका योगाश्रमच्या विविध शाखांमधून ७०० ते ८०० योगसाधक व योगशिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास संस्थेचे प्रमुख कार्यवाह श्री. विनायक देसाई गुरुजी, ज्येष्ठ योगशिक्षक श्री. व सौ. कर्पे, तसेच अम्बिका हेल्थकेअर प्रॉडक्शनचे प्रमुख श्री. पै यांची प्रमुख उपस्थिती लाभली.




कार्यक्रमाची सुरुवात सर्व योगसाधक व योगशिक्षकांनी एकत्र येऊन गायत्री मंत्राचे १०८ वेळा सामूहिक जप करून केली. त्यानंतर वातावरण शुद्ध व ऊर्जामय करणारा ओंकारनाद करण्यात आला, ज्यामुळे संपूर्ण आश्रम परिसर अध्यात्मिक शांततेने व सकारात्मक उर्जेने भरून गेला.

यानंतर नव्या बॅचमधील काही योगसाधकांनी आपले मनोगत व्यक्त केले. योगसाधनेपूर्वी व योगसाधनेनंतर त्यांच्या शारीरिक व मानसिक तसेच व्यवहारिक जीवनात झालेले सकारात्मक बदल, योगाश्रमाकडून मोफत योगशिक्षण देण्याच्या सेवाभावी वृत्तीने प्रेरणा मिळाल्याचे अनुभव, तसेच महाराष्ट्रातील विविध शाखांमधील योगसाधक व योगशिक्षकांमधील आपुलकीचे व सौहार्दपूर्ण संबंध याबद्दल त्यांनी मनापासून भावना व्यक्त केल्या. त्यांच्या या स्वानुभवांनी उपस्थितांना प्रेरणा व सकारात्मक ऊर्जा मिळाली.

या सोहळ्याचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे 'योगशिक्षक पदवीदान - २०२५' प्रदान समारंभ. अम्बिका योगाश्रममध्ये सलग २ वर्षांचे योगशिक्षण पूर्ण करून परीक्षा उत्तीर्ण झालेल्या नव्या योगशिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते योगशिक्षक पदवी प्रदान करण्यात आली. श्री विनायक देसाई गुरूजींनी उपस्थितांना संस्थेच्या एकूण कार्याबद्दलची माहिती व योग शिक्षणाविषयीचे अमूल्य असे मार्गदर्शन केले. कार्यक्रम स्थळी आनंद व अभिमानाचे वातावरण होते.

कार्यक्रमाची सांगता शांतीपाठाने करण्यात आली. त्यानंतर आयोजित केलेल्या स्नेहभोजनात योगसाधक व योगशिक्षकांनी एकमेकांशी मुक्त संवाद साधला, प्रश्नोत्तरे झाली व अनुभवांची देवाणघेवाण झाली. याच वेळी अम्बिका योगाश्रमच्या आयुर्वेदिक, रसायनमुक्त हेल्थकेअर उत्पादनांचे नाममात्र दरात प्रदर्शन व विक्रीही करण्यात आली, ज्यास उपस्थितांनी चांगला प्रतिसाद दिला.

यासोबतच, संस्थेचे प्रमुख कार्यवाह श्री. विनायक देसाई गुरुजी लिखित 'अनुपाठ' हे योगशास्त्राचा सार सांगणारे व शास्त्रोक्त योग आपल्या दैनंदिन जीवनात सहजपणे कसा अवलंबावा याचे मार्गदर्शन करणारे पुस्तक उपस्थितांसाठी विक्रीस उपलब्ध करण्यात आले होते त्याला खुप प्रतिसाद मिळाला.

## महागाव तहसीलसमोरील उपोषनाची झाली सांगता ; तहसीलदार अभय मस्के यांचे सकारात्मक पाऊल

**दैनिक युवक आधार :**

**महागाव :** महागाव तालुक्यातील श्रावण बाळ, संजय गांधी निराधार आणि अपंग योजनेचे लाभार्थी मागील दोन वर्षांपासून आपल्या हक्काच्या मानधनासाठी प्रशासकीय स्तरावर संघर्ष करत होते. या प्रलंबित मागण्यांसाठी आमणी बु. येथील विलास शंकर पाईकराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी २४ डिसेंबर २०२५ पासून तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण पुकारले होते. अखेर, यवतमाळ जिल्हा महिला काँग्रेसच्या माजी अध्यक्ष वनमालाताई राठोड आणि माजी सभापती सुनीलभाऊ राठोड यांच्या खंबीर नेतृत्वाखाली आणि तहसीलदार अभय मस्के यांच्या सकारात्मक मार्गदर्शनाखाली हे उपोषण यशस्वीरित्या सोडवण्यात आले.



**राठोड दाम्पत्याचा पुढाकार अन् निराधारांना न्याय**

उपोषणकर्त्यांची प्रकृती आणि लाभार्थ्यांची अडचण लक्षात घेता, वनमालाताई राठोड आणि सुनीलभाऊ राठोड गजानन पराते पवार साहेब भगवान पंडागळे यांनी तातडीने या विषयात लक्ष घातले. त्यांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलकांचे म्हणणे ऐकून घेतले आणि तात्काळ तहसील प्रशासनाशी संवाद साधला. निराधारांचे प्रश्न सुटल्याशिवाय मागे हटणार नाही, अशी आक्रमक परंतु संयमी भूमिका त्यांनी घेतल्याने प्रशासनाला तातडीने हालचाली कराव्या लागल्या.

**तहसीलदार अभय मस्के यांचे संवेदनशील मार्गदर्शन**

या संवेदनशील प्रकरणात तहसीलदार अभय मस्के यांनी अत्यंत सकारात्मक भूमिका घेतली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार गजानन पराते, नायब तहसीलदार पवार साहेब आणि भगवान पंडागळे यांनी उपोषणकर्त्यांशी चर्चा केली. प्रशासनाने केवळ आश्वासन न देता, प्रलंबित प्रकरणे तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून त्वरित निकाली काढण्याचे ठोस नियोजन केले. प्रशासनाने उपोषणकर्त्यांना पूर्ण मदत केली असून भविष्यातही अशा योजनांच्या अंमलबजावणीत कोणतीही अडचण येऊ देणार नाही, असा विश्वास तहसीलदार अभय मस्के यांच्या वतीने देण्यात आला.

**प्रशासकीय अधिकारी आणि नेत्यांच्या उपस्थितीत सांगता**

वनमालाताई राठोड आणि सुनीलभाऊ राठोड यांच्या मध्यस्थीने आणि तहसीलदार अभय मस्के यांच्या आश्वासक भूमिकेनंतर उपोषणकर्त्यांचे समाधान झाले. नायब तहसीलदार व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते उपोषणकर्त्यांना लिंबू सरबत देऊन या आंदोलनाची सांगता करण्यात आली.

गोरगरीब आणि निराधारांचे प्रश्न हे आमचे प्राधान्य आहे. तहसीलदार अभय मस्के यांनी या प्रकरणात घेतलेली सकारात्मक भूमिका कौतुकास्पद आहे. यापुढेही तालुक्यातील एकही पात्र लाभार्थी योजनेपासून वंचित राहणार नाही, यासाठी आम्ही प्रशासनाच्या मदतीने सदैव कटिबद्ध आहोत.

## अटलजींच्या कविता संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**मुंबई /प्रतिनिधी :** शिवनेर या संस्थेच्या वतीने मुंबई मराठी पत्रकार संघ येथे नुकताच अटलजींच्या स्मृतीदिनानिमित्त कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कवी संमेलनाला अनेक मान्यवरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अटलजींचे नेतृत्व फार मोठे होते त्यांच्या कविता देखील संपूर्ण देशभरात मोठ्या प्रमाणात गाजल्या होत्या त्या कविता लोकांपर्यंत पोहोचाव्या या उद्देशाने आम्ही या कवी संमेलनाचे आयोजन केले असल्याची माहिती शिवनेर संस्थेचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे यांनी दिली. अटलजींचे कविता आम्ही लहानपणापासून ऐकत आलो आहे. अटलजींनी संसदेमध्ये अनेक कवितेच्या माध्यमातून आपले विचार प्रकट केले होते. हे विचार आजही लोकं youtube च्या माध्यमातून तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून लोक ऐकत असतात.

त्याच कविता आपण लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी मी या कवी संमेलनामध्ये भाग घेत असल्याची माहिती समाजसेवक रोहिदास लोखंडे यांनी दिली. या कवी संमेलनामध्ये विविध मान्यवरांनी आपापल्या कविता सादर केल्या. यावेळी रसिक शते मंत्रमुग्ध होऊन या कविता ऐकत होते या. कार्यक्रमाला विविध तज्ञ मान्यवर मंडळी आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## टेंभुर्णी येथे मातंग समाजाच्या सभागृहाची उद्धघाटन

**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद टेंभूर्णी प्रतिनिधी/अनिल ससाने :** जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथील क्रांति नगर येथे मातंग समाजाच्या सभागृहाचे उद्धाघाटन करण्यात आले मा. आमदार संतोष भाऊ दानवे यांच्या प्रयत्नातून व जिल्हा परिषद सदस्य शालिकराव पाटील म्हस्के यांच्या न निदर्शनाखाली मातंग समाजाच्या सभागृहाचे उद्धाघाटन करून कामाला सुरुवात करण्यात आली जिल्हा परिषद सदस्य शालिकराव मस्के यांचे मोठे बंधू गणेशभाऊ मस्के यांच्या हस्ते उद्धाघाटन करण्यात आले



त्यावेळी पंडित साहेब टेंभुर्णी ग्रामपंचायत सदस्य किशोर कांबळे रवी उखर्डे माजी ग्रामपंचायत सदस्य ज्ञानदेव गोफणे सखाराम गोफणे, भातोडी सरपंच भारती मधुकर गोफणे, पापळ उपसरपंच अनिल ससाने, अनिता म्हस्के, संगीता गोफणे, सिताराम गोफणे, लिंबाजी गोफणे, शामराव गोफणे, दगडू गोफणे, रामेश्वर गोफणे, राजू सगट व इत्यादी क्रांतीनगर व लहूजीनगर टेंभुर्णी येथील मातंग समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते

## बृहन्मुंबई शाखेतर्फे 'यहाँ के हम सिकंदर' दिव्यांग बालमहोत्सव उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** अखिल भारतीय नाट्य परिषदेची संलग्न संस्था असलेल्या मध्यवर्ती बालरंगभूमी परिषदेच्या बृहन्मुंबई शाखेतर्फे दिनांक २२ डिसेंबर २०२५ रोजी दिव्यांग बालमहोत्सव 'यहाँ के हम सिकंदर' हा कार्यक्रम माटुंगा येथील यशवंत नाट्यमंदिरात सकाळच्या सत्रात अत्यंत उत्साहात व आनंदी वातावरणात पार पडला. दिव्यांग मुलांचा उत्स्फूर्त सहभाग, त्यांचा जल्लोष आणि प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद यामुळे संपूर्ण नाट्यमंदिर आनंदाने भारावून गेले होते.

हा उपक्रम मध्यवर्ती बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा मा. नीलमताई शिर्के–सामंत यांच्या संकल्पनेतून साकार झाला. या दिव्यांग बालमहोत्सवात होप फाउंडेशन (बांद्रा), मणिलाल सुंदरजी मनपा शाळा (विलेपार्ले), शिशु कल्याण केंद्र (अंधेरी), प्रगती विद्यालय – कर्णबधिरांसाठी (प्रभादेवी-दादर), हीलिंग टच रिहॅबिलिटेशन सेंटर (विक्रोळी), प्रगती केंद्र संचालित गे.उ. शाह मीरा विद्यालय (माटुंगा), पूर्वा फाउंडेशन (मुलुंड पूर्व), साधना विद्यालय (दादर), पुनर्वास एज्युकेशन सोसायटी (गोरेगाव पूर्व), पुनर्वास स्पेशल स्कूल (गोरेगाव पश्चिम), मुक्ताई फाउंडेशन (भांडुप पश्चिम), आधारिका फाउंडेशन (कांदिवली पूर्व) आदी संस्थांनी सहभाग नोंदवला.

सुमारे १६० दिव्यांग मुलांनी विविध कला सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. काही मुलांनी मधुर स्वरात गाणी सादर केली, तर काहींच्या बहारदार नृत्यांनी सभागृहात जल्लोष निर्माण केला. दोन चिमुकल्या मुलींनी गोड आवाजात कविता सादर केल्या. एका शाळेच्या विद्यार्थ्यांनी अवघ्या पाच मिनिटांत रंगमंचावर चित्रकला सादर करून 'तारे जमीं पर' या गाण्यावर ती प्रेक्षकांना




दाखवली; त्याला भरघोस दाद मिळाली. तसेच एका शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पिरॅमिड प्रात्यक्षिकाला टाळ्यांचा कडकडाट झाला. मुक्ताई फाउंडेशन व मीरा विद्यालय यांनी विविध वस्तूंचे स्टॉलही उभारले होते.

कार्यक्रमात सहभागी झालेल्या प्रत्येक मुलाला सर्टिफिकेट व खाऊ देण्यात आला. प्रत्येक सहभागी शाळा व संस्थेला ट्रॉफी, तसेच या दिव्यांग मुलांना घडविणाऱ्या विशेष शिक्षकांनाही ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमादरम्यान व कार्यक्रमानंतरही मुलांच्या चेहऱ्यावर झळकणारा आनंद आयोजकांसाठी समाधान देणारा ठरला. दिव्यांग मुलांच्या सादरीकरणातून 'यहाँ के हम सिकंदर' हे त्यांनी प्रत्यक्ष सिद्ध केल्याची भावना सर्वांनाच जाणवली.

या कार्यक्रमासाठी मध्यवर्ती शाखेचे सहकार्यवाह आसिफ अन्सारी, बृहन्मुंबई शाखेच्या कार्याध्यक्ष अभिनेत्री ज्योती निसळ, कोषाध्यक्ष यशोदा माळकर, देऊ माळकर, महेश कापडोस्कर, लव क्षीरसागर, कृष्णा पाटील तसेच मीडिया प्रमुख गणेश तळेकर यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाला नाट्य परिषद कल्याणचे उपाध्यक्ष व मध्यवर्ती बालरंगभूमी परिषदेचे निमंत्रित सदस्य श्री. शिवाजी शिंदे यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमानंतर अनेक शिक्षक व मुख्याध्यापकांनी हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून, यामुळे मुलांना प्रचंड आनंद मिळाल्याची भावना व्यक्त केली. यावेळी अभिनेत्री ज्योती निसळ म्हणाल्या, "या दिव्यांग मुलांचे सादरीकरण पाहताना माणूस म्हणून सामाजिक बांधिलकीची एक आंतरिक, आत्मिक लहर हृदयात सळसळून जाते."

दरवर्षी असा दिव्यांग बालमहोत्सव आयोजित व्हावा, अशी इच्छा पालकांनीही व्यक्त केली, हे या कार्यक्रमाचे मोठे यश ठरले

## टाकळी येथील अजय घाळवट यांची पोलीस उपनिरीक्षक पदी गवसणी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/सय्यद ईसा :** प्रशासकीय सेवेत प्रवेश मिळविणाऱ्या यशस्वीताप्रमाणेच इतर क्षेत्रातील यशस्वीतांचे पण सत्कार व्हावे जेणेकरून त्यामुळे त्यांना पण त्यांच्या क्षेत्रात यशस्वी होण्याचे प्रोत्साहन मिळेल असे प्रतिपादन माहूर चे तहसीलदार अभिजित जगताप यांनी केले. मौजे टाकळी येथे अजय संजय घाळवट यांची पोलीस उपनिरीक्षक पदी नियुक्ती झाल्या बद्दल टाकळी ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने आयोजित नागरी सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच कुंडलिक तोडसाम, प्रमुख पाहुणे माहूरचे तहसीलदार अभिजित जगताप , भाजप युवा नेते डॉ. निरंजन केशवे, जगदंबा महाविद्यालय माहूरचे प्राचार्य विश्वासराव जाधव, माजी सरपंच नामदेवराव पाटील, जेष्ठ पत्रकार जयकुमार अडकीने, तंटामुक्ती अध्यक्ष भागवत जायभाये, भाजप युवा नेते विनायक मुसळे, माजी सरपंच लक्ष्मण घुले, जि.प. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुधाकर चेवटे, कृषी सहायक करुणा



दामोदर, सत्कारमूर्ती अजय घाळवटचे माता पिता सौ. इंदूताई व संजय घाळवट, तंटामुक्ती समिती उपाध्यक्ष महेंद्र घाळवट, ग्रा.प. सदस्य सुनील घाळवट, गंगाबाई तोडसाम व समस्त ग्रा.प. सदस्य आदींच्या उपस्थितीत सत्कारमूर्ती अजय घाळवट व त्यांचे माता पिता सौ. इंदूताई व संजय घाळवट यांचा ग्रामपंचायत टाकळी व ग्रामस्थांच्या वतीने भव्य नागरी सत्कार करण्यात आला यावेळी उपस्थित प्रमुख पाहुण्यांनी शुभेच्छा, अभिनंदन व कौतुकपर मनोगत व्यक्त केले.

पुढे बोलतांना तहसीलदार जगताप म्हणाले की, सध्या वाढत्या खाजगीकरणामुळे शासकीय नौकऱ्याची संख्या घटत असल्याने प्रत्येकालाचा नौकरी मिळणे शक्य नाही. तर शासकीय नौकरी व्यतिरिक्त उद्योग व इतर अनेक क्षेत्रात सुद्धा खूप संधी आहे. विद्यार्थ्यांनी नौकरीसाठीच शिक्षण हा भ्रम दूरू करून आपण घेतलेल्या शिक्षणाचा व्यापार उद्योग व ज्या ज्या क्षेत्रात संधी आहेत अशा इतर क्षेत्रात पण करीअर निवडावे. तसेच प्रशासकीय सेवेत प्रवेश मिळविणाऱ्या यशस्वीता प्रमाणेच इतर क्षेत्रातील यशस्वीतांचे पण सत्कार सोहळे घेऊन त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्तविक ग्राम पंचायत अधिकारी व्ही.एस.जाधव, यांनी केले सूत्रसंचालन उपसरपंच प्रतिनिधी फयाज फारुकी यांनी व आभार प्रदर्शन माजी सरपंच लक्ष्मण घुले यांनी केले. याच सोहळ्यात किनवट माहूर विधानसभा मतदार संघाचे आमदार भीमराव केराम यांनी सत्कारमूर्ती पोलीस उपनिरीक्षक अजय घाळवट यांना भ्रमणध्वनीवरून शुभेच्छा दिल्या.

यावेळी जि.प. प्रा.शाळा टाकळीचे सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी बालक व गावातील सर्व नागरिक उपस्थित होते.

## मा.आ.भिमरावजी धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली महेश सहकारी साखर कारखान्यावर शेतकरी मेळावा संपन्न

### हजारो बेरोजगारांना मिळणार रोजगार, उद्योगधंद्यांना मिळणार चालना

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी :**

मारुती सत्रे : आष्टी विधानसभा मतदार संघाचे मा.आ.भिमरावजी धोंडे यांच्या नेतृत्वाखाली महेश सहकारी साखर कारखान्याचे लायसन पूर्ववत झाल्याने माझ्या भागातील शेतकरी सुधारला पाहिजे बेरोजगार तरुणांच्या हाताला रोजगार मिळाला पाहिजे शेतकऱ्यांची प्रगती झाली पाहिजे म्हणून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त ऊसाचे उत्पादन कसे वाढवावे व प्रगतशील शेती कशी करावी यासाठी आष्टी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार भीमरावजी धोंडे यांनी महेश सहकारी साखर कारखान्याच्या वतीने तालुक्यातील व परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी योग्य ऊस व्यवस्थापन या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर भव्य मार्गदर्शनपर शेतकरी मेळाव्याचे आयोजन आज शुक्रवार, दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वा.महेश साखर कारखान्यावरती करण्यात आले होते.लवकरच आष्टी तालुक्याची कामधेनू पूर्ववत सुरू होणार असल्याने




परिसरातील बेरोजगार तरुणांच्या हाताला काम मिळणार असून उद्योग धंद्यांना चालणा मिळणार आहे.मा.आ.भिमरावजी धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी मेळावा उत्साहात संपन्न झाला या मेळाव्यात ऊस उत्पादन वाढ, उत्पादन खर्चात बचत,आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे मार्गदर्शनपर कार्यक्रमात II Care Foundation व ACFI चे अधिकारी विठ्ठल भापकर हे ऊस लागवड पद्धती, सुधारित बियाणे, योग्य खत व्यवस्थापन,पाणी नियोजन,रोग व किड नियंत्रण, उत्पादन वाढीसाठी आवश्यक असलेल्या आधुनिक उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले II Care Foundation च्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध शेतकरीपूरक योजनांची माहिती देण्यात आली यानंतर नाना ऊस तंत्रज्ञानाचे तज्ज्ञ श्री. नवनाथ गायकवाड हे आधुनिक ऊस तंत्रज्ञान,नव्या लागवड पद्धती, कमी खर्चात अधिक उत्पादन कसे मिळवावे,ऊसाची गुणवत्ता कशी सुधारावी, शाश्वत ऊस शेतीबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले या कार्यक्रमास कारखान्याचे चेअरमन,सर्व संचालक मंडळ, पदाधिकारी, ACFI चे वरिष्ठ अधिकारी, II Care Foundation चे प्रतिनिधी, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.यावेळी व्यासपीठावर युवा नेते अजय दादा धोंडे,नियामत बेग, हनुमंत थोरवे, पांडुरंग नागरगोजे,अशोक साळवे,नियामत बेग, संतोष भैय्या चव्हाण, सरपंच सावता ससाणे,आजिनाथ बेल्हेकर,मा.सभापती बाबासाहेब आंधळे,संभाजी दहातोंडे,सतिश झगडे, यांच्यासह परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.